# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक १० मार्च, २०२५ / फाल्गुन १९, १९४६ ( शके )**

**यांचे प्रभारी विभाग:**

**(१) उप मुख्यमंत्री**
**(२) उच्च व तंत्रशिक्षण, संसदीय कार्ये मंत्री**
**(३) शालेय शिक्षण मंत्री**
**(४) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री**
**(५) पणन, राजशिष्टाचार मंत्री**
**(६) क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास आणि औकाफ मंत्री**
**(७) अन्न व औषध प्रशासन, विशेष सहाय्य मंत्री**
**(८) वस्त्रोद्योग मंत्री**
**(९) सहकार मंत्री**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३१**

---

### शेतकऱ्यांना भात खरेदीसाठी ऑनलाईन 'ई-पीक' नोंदणी करताना येत असलेल्या अडचणींबाबत

**(१) * १५९८ श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शेतकऱ्यांनी ऑनलाईन 'ई-पीक' नोंदणी केली असेल तरच शासनाच्या आधारभूत भात खरेदी केंद्रावर हमी भावाने शेतकऱ्यांचे भात खरेदी केला जाणार असून ज्या शेतकऱ्यांनी 'ई-पीक' नोंदणी केली नसेल अशा शेतकऱ्यांचा भात शासनाकडून खरेदी केला जात नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शहापूर तालुक्यात बहुसंख्य शेतकऱ्यांचे सामाईक क्षेत्र असल्याने त्यांना शासनाकडून मागितलेल्या संमती पत्रासाठी अनेक अडचणींचा सामना करावा लागत असून अनेक आदिवासी शेतकऱ्यांकडे स्मार्ट फोन नसणे, तसेच मोबाईलला नेटवर्क नसल्याने 'ई-पीक' नोंदणी करण्यात अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, 'ई-पीक' नोंदणी झालेली असूनदेखील आधारभूत भात खरेदी केंद्रावर फिंगर प्रिंट देण्याची यंत्रणा नसल्याने फिंगरप्रिंट देण्यासाठी तालुका कार्यालयात यावे लागत असल्याने तालुक्यातील शेतकऱ्यांना भात विक्री करताना अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या सर्व प्रकरणी शासनाने चौकशी करुन भात खरेदीसाठी घातलेली जाचक अट रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार :** (१) किमान आधारभूत किंमत योजनेंतर्गत खरेदी करण्यात येणाऱ्या धान खरेदीमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी आवश्यक प्रक्रियेचा भाग म्हणून ई-पीक नोंदणीची आवश्यकता करण्यात आली आहे.

(२) अंशतः खरे आहे.

सामाईक क्षेत्र असलेल्या ७/१२ उता-यामधील इतर व्यक्तींकडून तक्रार होऊ नये व धान विक्री करणाऱ्या शेतकऱ्यांस देखिल याचा त्रास होऊ नये, यासाठी अभिकर्ता संस्थांकडून संमतीपत्रक घेण्यात येते. मोबाईल नेटवर्क नसणे या कारणामुळे ई -पीक नोंदणी प्रक्रियेत तात्पुरत्या स्वरुपात अडथळे निर्माण होण्याची शक्यता असते.

(३) हे खरे नाही.

धान खरेदी केंद्रावर शेतक-यांचे बायोमेट्रीक यंत्राद्वारे प्रमाणीकरण करण्याची सुविधा उपलब्ध आहे. त्यामुळे शेतक-यांना तालुका कार्यालयात जाण्याची बाब उद्भवत नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### कांद्यावरील २० टक्के निर्यात शुल्क रद्द करण्याबाबत

**(२) * ५८ श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्रीमती सरोज अहिरे (देवळाली), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.सचिन पाटील (फलटण), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.शंकर मांडेकर (भोर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.अनिल पाटील (अमळनेर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मोठया प्रमाणात कांद्याचे उत्पन्न झाले असताना केंद्र शासनाने कांद्यावर २० टक्के निर्यात शुल्क आकारल्यामुळे कांदा उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कांद्यावरील निर्यात शुल्क माफ करण्यासंदर्भात केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्याबाबतचे आश्वासन मा.उपमुख्यमंत्री (वित्त) यांनी दिनांक २० डिसेंबर, २०२४ रोजीच्या नाशिक दौऱ्यादरम्यान दिले असतानाही त्याची अद्याप अंमलबजावणी झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निर्यात शुल्क रद्द करणेबाबत नाशिकमध्ये ठिकठिकाणी आंदोलने करुन लिलाव बंद पाडले असून अनेक स्थानिक लोकप्रतिनिधींनी याबाबत शासनाकडे निवेदनाच्या माध्यमातून मागणी केलेली असून शेतकऱ्यांनी बाजारपेठा बंद करण्याचा इशारा दिलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी करुन कांद्यावरील २० टक्के निर्यात शुल्क रद्द करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१), (२), (३) व (४) हे अंशत: खरे आहे.

कांदा निर्यात संदर्भात धोरण ठरवणे ही बाब केंद्र शासनाशी निगडीत आहे. कांद्यावरील २० टक्के निर्यात शुल्क रद्द करण्यासंदर्भात शासनातर्फे दिनांक १८/१२/२०२४ च्या पत्रान्वये केंद्र शासनास विनंती करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### नागपूर जिल्हयातील शाळांमध्ये “आर ओ वॉटर” ची सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३) * १९८ श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यामधील सर्व आस्थापनांच्या ३९७५ शाळांपैकी १२५८ शाळांमध्ये विद्यार्थ्यांना पिण्याच्या पाण्यासाठी “आर ओ वॉटर” ची सुविधा उपलब्ध नसल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्वच्छ पाण्याअभावी विद्यार्थ्यांना जुलाब, उलटी, टायफॉईड, गॅस्ट्रो इत्यादी आजारांचा त्रास होत असून त्यांच्या आरोग्य सुरक्षिततेवर प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन नागपूर जिल्हयातील सर्व शाळांमध्ये "आर ओ वॉटर" ची सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) नागपूर जिल्ह्यात सद्य:स्थितीत युडायस २०२४-२५ नुसार सर्व व्यवस्थापनांच्या एकूण ३९८० शाळा असून त्यापैकी २४५१ शाळांमध्ये "आर ओ वॉटर" ची सुविधा सुस्थितीत उपलब्ध असून ३११ शाळांमधील उपलब्ध आर ओ वॉटर ची सुविधा नादुरूस्त आहे व १२१८ शाळामध्ये "आर ओ वॉटर" ची सुविधा उपलब्ध नसून त्यापैकी जिल्हा परिषदेच्या ६४१ शाळांमध्ये सदर सुविधा उपलब्ध नाही.
(२) हे खरे नाही.
(३) नागपूर जिल्हा परिषदेच्या सर्व शाळांना जल जीवन मिशन अंतर्गत नळाव्दारे पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली असल्याने सर्व शाळांना "आर ओ वॉटर" ची सुविधा तातडीने देण्याची गरज दिसून येत नाही. तरीही उर्वरीत शाळांकरीता माहिती घेवून गरजेनुसार "आर ओ वॉटर" सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील विद्यार्थ्यांना गणवेश मिळत नसल्याबाबत

**(४) * ७२ श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.भास्कर जाधव (गुहागर), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.बाबासाहेब देशमुख (सांगोले), श्री.प्रविण विरभद्रया स्वामी (सर) (उमरगा), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.राजेंद्र गावित (पालघर), श्री.हारुन खान (वर्सोवा), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.अभिजीत पाटील (माढा), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.राजन नाईक (नालासोपारा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाच्या "एक राज्य एक गणवेश" या योजनेंतर्गत सन २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षात केंद्रीकृत पद्धतीने शालेय विद्यार्थ्यांना मोफत गणवेश वाटपाचा निर्णय शासनाने घेतला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेच्या अंमलबजावणीमध्ये अनेक त्रुटी, गैरव्यवहार, एकाच कंत्राटदाराला कंत्राट देणे, एकाच टेलरची निवड करणे, गणवेशांचा निकृष्ट दर्जा, कमी-जास्त मोजमाप, गणवेश वेळेत न मिळणे इत्यादी अनेक कारणास्तव अनेक विद्यार्थी गणवेशापासून वंचित राहिले असून आदिवासी व दुर्गम भागातील विद्यार्थी फाटके कपडे घालून शाळेत जात असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक २० डिसेंबर, २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार केंद्रीकृत पद्धतीने गणवेश वितरणात येत असलेल्या अडचणींमुळे ही पद्धत बंद करुन पूर्वीप्रमाणेच शालेय व्यवस्थापन समितीमार्फतच गणवेश वितरीत करण्याचा निर्णय शासनाने घेतला असतानाही त्याची अद्यापही प्रभावी अंमलबजावणी झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या सर्व प्रकरणांची शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) समग्र शिक्षा व राज्य मोफत गणवेश वाटप योजनेंतर्गत दोन गणवेशाचा लाभ देण्यात येतो. त्यापैकी सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात एक गणवेश महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत शिलाई करुन व दुसरा गणवेश (स्काऊट व गाईड) शाळा व्यवस्थापन समितीमार्फत स्थानिक पातळीवर शिलाई करुन देण्यात येत आहेत. शिलाईसाठी प्रति गणवेश रु.११०/- अशी रक्कम निश्चित करण्यात आली आहे.

सदर योजनेंतर्गत राज्यातील एकूण ४४,६०,००४ इतके विद्यार्थी लाभार्थी आहेत. विद्यार्थ्यांना गणवेशाचा लाभ विहित कालमर्यादेत देण्यासाठी दुसऱ्या गणवेशाचा लाभ शाळा व्यवस्थापन समितीमार्फत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुषंगाने दुसरा गणवेश शिलाई करुन देण्यात येणाऱ्या गणवेशाचे कापड योजनेंतर्गत पात्र शाळांना पुरवठा करण्यात आले आहे. स्थानिक पातळीवर विद्यार्थ्यांना गणवेश उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरू आहे.

(३), (४) व (५) शैक्षणिक वर्ष सन २०२५-२६ पासून मोफत गणवेशाचा लाभ शाळा व्यवस्थापन समितीमार्फत देण्याचा निर्णय दि.२० डिसेंबर, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे. तसेच, सदर शासन निर्णयान्वये विद्यार्थीनींना इयत्तेनिहाय पिनो-फ्रॉक, शर्ट-स्कर्ट, सलवार-कमीज देण्याचा निर्णय घेण्याची जबाबदारी संबंधित शाळा व्यवस्थापन समितीस देण्यात आली आहे.

-----------------

## मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत नियुक्त केलेल्या प्रशिक्षणार्थींना प्रलंबित मानधन देण्याबाबत

**(५) * १०० श्री.राजेंद्र गावित (पालघर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.गोपिचंद पडळकर (जत), श्री.आमश्या पाडवी (अक्कलकुवा), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्री.करण देवतळे (वरोरा), श्री.योगेश सागर (चारकोप), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव-पाथर्डी), श्री.विक्रम पाचपुते (श्रीगोंदा), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या दिनांक ९ जुलै, २०२४ च्या शासन निर्णयानुसार मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत राज्यातील जवळजवळ १ लाख १० हजार बेरोजगार युवक व युवतींना राज्यातील विविध आस्थापनांमध्ये सहा महिने मुदतीसाठी प्रशिक्षणार्थी म्हणून रुजू करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेंतर्गत नियुक्त करण्यात आलेल्या शेकडो प्रशिक्षणार्थींना अद्यापही गत चार महिन्यांपासून मानधन मिळाले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासकीय आस्थापनांमध्ये या प्रशिक्षणार्थींचा कार्यकाळ केवळ सहा महिने असल्यामुळे हे सर्व प्रशिक्षणार्थी पुन्हा बेरोजगार होणार असल्यामुळे त्यांचा प्रशिक्षण कार्यकाळ व विद्यावेतन दोन्हीमध्ये वाढ करण्याची तसेच त्यांना शासनाच्या भरती प्रक्रियेत कायमस्वरुपी अथवा कंत्राटी पद्धतीने सामावून घेण्याबाबतची मागणी शासनाकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

दि.१७.०२.२०२५ पर्यंत रुजू झालेल्या १,२८,१०४ प्रशिक्षणार्थ्यांपैकी १,२३,२५४ प्रशिक्षणार्थ्यांची हजेरी नोंदविण्याची प्रक्रीया पूर्ण झाली असून १,१८,६६३ प्रशिक्षणार्थ्यांना त्यांना अनुज्ञेय असलेले विद्यावेतन अदा करण्यात

आले आहे.

सर्व प्रशिक्षणार्थ्यांना विहीत कालावधीत विद्यावेतन अदा करण्याकरीता प्रशिक्षणार्थ्यांच्या बॅंक खात्याच्या अचूक तपशीलासह त्यांची उपस्थिती शासनाने विहीत केलेल्या पोर्टलवर वेळेवर नोंदविण्याबाबत सर्व संबंधितांना कळविण्यात आले आहे.

(३) व (४) मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेचा कालावधी व विद्यावेतन दोन्हींमध्ये वाढ करण्याची तसेच त्यांना शासनाच्या भरती प्रक्रियेत कायमस्वरुपी अथवा कंत्राटी पद्धतीने सामावून घेणे इत्यादी मागण्यांबाबत प्रशिक्षणार्थी तसेच लोकप्रतिनिधींकडून निवेदने प्राप्त झाली आहेत.

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत १८ ते ३५ वर्षे वयोगटातील युवकांना शासकीय / निमशासकीय / खाजगी आस्थापनांत ६ महिन्यांसाठी कार्यप्रशिक्षणाची संधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सदर बाब ही नियुक्ती नसून केवळ प्रशिक्षणाची संधी आहे. या योजनेंतर्गत मर्यादीत वेळेत जास्तीत जास्त उमेदवारांना कार्यप्रशिक्षणाचा लाभ घेता यावा, याकरीता कार्यप्रशिक्षणाचा कालावधी ६ महिने इतका निश्चित करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ व प्रोत्साहन अनुदान देण्याबाबत**

**(६) * ४२ श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्रीमती सरोज अहिरे (देवळाली), श्री.संजय देरकर (वणी), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.सचिन पाटील (फलटण), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती सना मलिक (अणुशक्ती नगर), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव-पाथर्डी), श्री.आनंद तिडके (नांदेड दक्षिण), श्री.नितीन भिकनराव देशमुख (बाळापूर), श्री.सुहास बाबर (खानापूर), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व) श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री यांनी सन २०१७ मध्ये "छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना" तसेच सन २०१९ मध्ये "महात्मा ज्योतिराव फुले कर्जमुक्ती योजना" जाहीर करुन त्याची प्रभावी अंमलबजावणी झाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेनुसार दिनांक ३० जून, २०१६ पर्यंतच्या काळातील शेतकऱ्यांचे दीड लाखांपर्यंतचे थकीत पीक कर्ज माफ करण्यात आले असून दीड लाखांच्या वरील कर्जदारांसाठी एकरकमी परतफेड योजनेनुसार शेतकऱ्यांनी दीड लाखाच्या वरचे कर्ज भरल्यास दीड लाख रुपये शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यात जमा करण्यात येणार होते, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच सन २०१५-२०१६ आणि सन २०१६-२०१७ या दोन वर्षांत नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना २५ हजार रुपयांचे प्रोत्साहन अनुदान देण्याचा निर्णय देखील शासनाने घेतला होता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, गत ८ वर्षापासून अटी शर्तींची पुर्तता करुनही ६.५६ लाख पात्र शेतकरी ५,९७५ कोटी इतक्या रकमेच्या कर्जमाफी लाभापासून अद्यापही वंचित असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन सदरहू योजनेमध्ये पात्र असलेल्या शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ व प्रोत्साहन अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील :** (१) नाही,

छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना-२०१७ अंतर्गत लाभास पात्र असलेल्या ५०.६० लाख

शेतकऱ्यांपैकी ४४.०४ लाख (८७%) शेतकऱ्यांना योजनेचा लाभ देण्यात आला आहे. तसेच सदर योजनेंतर्गत पात्र असलेल्या ६.५६ लाख शेतकऱ्यांना लाभ देण्याच्या अनुषंगाने कार्यवाही सुरु आहे. त्याचप्रमाणे महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०१९ अंतर्गत पात्र असलेल्या ३२.४२ लाख शेतकऱ्यांपैकी ३२.२७ लाख (९९.५३%) शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ देण्यात आला आहे. त्यामुळे या दोन्ही योजनांची प्रभावी अंमलबजावणी झाली नाही, अशी वस्तुस्थिती नाही.

(२), (३) व (४) हे खरे आहे.

(५) छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना-२०१७ या योजनेंतर्गत पात्र असलेल्या ६.५६ लाख शेतकऱ्यांना लाभ देण्याच्या अनुषंगाने तत्कालीन मा. मुख्यमंत्री महोदय यांनी केलेल्या घोषणेच्या पार्श्वभूमीवर, मा. मुख्य सचिव यांनी दि. २७.०३.२०२४ रोजी बैठक घेतली. सदर बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार, या योजनेच्या माहितीचे संगणकीय संस्करण करण्यासाठी शेतकऱ्यांनी ऑनलाईन पद्धतीने केलेल्या अर्जातील कर्जखात्यांची, बँकांकडून घेण्यात आलेल्या कर्जखात्यांची व संगणकीय संस्करण करुन जाहीर करण्यात आलेल्या १ ते २३ ग्रीन लिस्ट मधील पात्र लाभार्थ्यांच्या पोर्टलमध्ये उपलब्ध असलेल्या माहितीनुसार कार्यवाही करण्याबाबत महा-आयटी या संस्थेस निर्देश देण्यात आले आहेत. तसेच या योजनेंतर्गत पात्र व प्रलंबित असलेल्या लाभार्थ्यांच्या याद्या संकलित करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व राज्यस्तरीय बँकर्स समिती यांचेकडून पात्र व प्रलंबित असलेल्या लाभार्थ्यांची माहिती प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शाळांमधील विद्यार्थ्यांना उत्तम शैक्षणिक सुविधा देणेबाबत

**(७) * २०८ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.करण देवतळे (वरोरा), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.गजानन लवटे (दर्यापूर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), डॉ.संजय कुटे (जळगाव जामोद), श्री.रमेश कराड (लातूर ग्रामीण), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.हारुन खान (वर्सोवा), श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), डॉ.विनय विलासराव कोरे (सावकर) (शाहूवाडी), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.राजन नाईक (नालासोपारा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.अभिजीत पाटील (माढा), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.राहुल आवाडे (इचलकरंजी), श्री.राघवेंद्र (रामदादा) मनोहर पाटील (धुळे ग्रामीण), श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिक्षण विभागाकडून शाळांमध्ये शाळाबाह्य मुलांचा शोध घेण्यासाठी मोहिम राबविली जात असून यामध्ये अगदी नगण्य विद्यार्थ्यांची संख्या दर्शविण्यात येत असताना त्यात शिक्षण विभागाच्या स्टुडंट पोर्टलवर नोंद असणारी शाळाबाह्य मुलांची आकडेवारी लाखात असल्याचे दिसून येत असून ड्रॉप बॉक्समध्ये जवळपास १० लाख विद्यार्थ्यांची नोंद असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शाळांमध्ये मुलांना अभ्यासासाठी आनंददायी वातावरण आणि पायाभूत व मुलभूत शैक्षणिक सुविधा असणे आवश्यक असताना जवळजवळ १ लाख ८ हजाराहून अधिक शाळांमध्ये शौचालय नसणे, डिजीटल लायब्ररी नसणे,

सुरळीत वीज पुरवठा नसणे इ. सुविधांचा अभाव असल्याचे यु-डायस प्लसच्या अहवालातून नुकतेच निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने दिनांक १८ सप्टेंबर, २०२३ रोजी दत्तक शाळा योजनेचा शासन निर्णय जाहिर करुनही त्याची प्रभावी अंमलबजावणी झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शाळांमध्ये ड्रॉप बॉक्सचे प्रमाण शून्यावर आणण्याच्या सूचना शिक्षण विभागाने शाळा व मुख्याध्यापकांना देऊनही त्याच्या अंमलबजावणीत अनेक अडचणी येत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या सर्व बाबींची शासनाने चौकशी करुन विद्यार्थ्यांना उत्तम शैक्षणिक सुविधा देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

(४) अंशत: खरे आहे.

(५) समग्र शिक्षा अभियान, स्टार्स प्रकल्प, शालेय पोषण आहार, जिल्हा नियोजन व विकास समितीद्वारे भौतिक सुविधांचा विकास, पीएमश्री प्रकल्प, मोफत गणवेश, पाठ्यपुस्तके, आदर्श शाळा योजना, मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियान, नियतकालिक चाचण्या, शिक्षक प्रशिक्षण उपक्रम, इत्यादी योजना/उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना उत्तम शैक्षणिक गुणवत्ता प्रदान करण्यात येत आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत लिपीक व शिपाई पदाच्या भरती प्रक्रियेत झालेला गैरव्यवहार**

**(८) * १०५९ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत लिपिक व शिपाई पदाच्या भरतीप्रक्रियेत परिक्षा व मुलाखतीमध्ये मोठया प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत अनेक तक्रारी प्राप्त झाल्या असून श्री.मनोज पोतराजे यांनी सदर भरती प्रक्रियेत झालेल्या आर्थिक गैरव्यवहाराची सखोल चौकशी करण्यात यावी व भरती प्रक्रिया रद्द करण्यात यावी या मागणीसाठी आमरण उपोषण सुरू केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या भरती प्रक्रियेची सखोल चौकशी करुन यातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या लिपिक व शिपाई पदांच्या नोकरभरतीच्या परीक्षा प्रक्रिया व मुलाखतीमध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार झाल्याबाबत प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, चंद्रपूर यांचेमार्फत चौकशी करण्यात येत आहे. सदर चौकशी सद्य:स्थितीत सुरु असून त्याबाबतचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही

----------------

**मुंबईतील दि सिटी को.ऑप.बँकेमध्ये झालेला आर्थिक गैरव्यवहार**

**(९) * ३८३६ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील दि सिटी को.ऑप. बँकेच्या संचालक मंडळाने सन २०१०-२०१५ या कालावधीत विकासकांना नियमबाह्यरित्या कर्ज देऊन केलेल्या ८०० कोटी रुपयांच्या आर्थिक गैरव्यवहारासंबंधात लेखापरिक्षण अहवाल सादर होऊन ६ वर्षे होऊनही अद्याप शासनाकडून संबंधित दोषींविरुद्ध कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्याचे दिनांक २२ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बँकेच्या थकबाकी आणि कर्जात भरमसाठ वाढ होऊन बँक दिवाळखोरीत गेल्याने रिझर्व्ह बँकेने सदरहू बँकेचा परवाना दिनांक १९ जून, २०२४ रोजी वा त्यासुमारास रद्द केला असतानाही सदरहू गैरव्यवहाराच्या प्रकरणाचा तपास बँकेच्या संचालक मंडळाने निबंधकाशी संगनमत करुन प्रलंबित ठेवला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन खातेदारांचा निधी परत करणे, थकीत कर्ज वसुली करणेसह दोषी संचालक मंडळ तसेच संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील :** (१), (२), व (३) दि सिटी को-ऑप. बँक लि., मुंबई या बँकेचे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८१ (३) (क) नुसार दि. १०/११/२०१० ते दिनांक ३१/०५/२०१५ या कालावधीतील चाचणी लेखापरिक्षण करण्यासाठी सहकार आयुक्तांनी सहनिबंधक, (लेखापरिक्षण), सहकारी संस्था, मुंबई यांची नियुक्ती केली. चाचणी लेखापरिक्षणात बँकेच्या कर्जवाटपात अनियमितता आढळून आल्याने अधिनियमाच्या कलम ८८ अन्वये संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून त्यांच्याकडून आर्थिक नुकसानीची रक्कम निश्चित करण्यासाठी दि.२१.०५.२०१९ रोजीच्या आदेशान्वये सहकार आयुक्तांनी विभागीय निबंधक, सहकारी संस्था, मुंबई यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे. सदर चौकशी आदेशाविरुध्द बँकेचे अध्यक्ष व संचालक यांनी मा.मंत्री (सहकार) यांच्याकडे अपील दाखल केले असून सदर आदेशास दि.३०.०९.२०२० रोजी शासनाने स्थगिती दिली होती. सदर स्थगिती दि.०३.०२.२०२३ रोजी उठविण्यात आली आहे. सद्य:स्थितीत कलम ८८ अन्वये पुढील कार्यवाही सुरु आहे.

दि सिटी को-ऑप. बँक लि., मुंबई या बँकेचा भारतीय रिझर्व्ह बँकेने दि. १९/०६/२०२४ रोजीच्या आदेशान्वये बँकिंग परवाना रद्द केला आहे. सहकार आयुक्त कार्यालयाच्या दि.२०/०६/२०२४ रोजीच्या आदेशान्वये बँकेवर अवसायक म्हणून जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई १ यांची नियुक्ती केली आहे.

दि सिटी को ऑप बँक लि. मुंबई या बँकेवर भारतीय रिझर्व्ह बॅकेने आर्थिक निर्बंध लादल्यानंतर, बँकेने 'हार्डशीप' योजनेअंतर्गत दि.३१/०३/२०२४ पर्यंत एकूण २२९२३ ठेवीदारांना रक्कम रु१०६.२६ कोटी अदा केली आहे. पाच लाखापर्यंत एकूण १२,५६० ठेवीदारांना रक्कम रु.२३०.९४ कोटी अदा करण्यात आली आहे. रु.५.०० लाखाच्या आतील देय असलेल्या रु. ३३.१९ कोटी पैकी १९०७ ठेवीदारांची रक्कम रु. १३.०३ कोटीचे क्लेम DICGC ला सादर करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील इंग्रजी माध्यमाच्या शाळांना थकीत आरटीई शुल्क परतावा देण्याबाबत**

**(१०) * ६५४ श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.करण देवतळे (वरोरा), श्री.विजयसिंह पंडित (गेवराई), डॉ.संजय कुटे (जळगाव जामोद), श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), डॉ.विनय विलासराव कोरे (सावकर) (शाहूवाडी), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण**

**(अकोला पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.राघवेंद्र (रामदादा) मनोहर पाटील (धुळे ग्रामीण), श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर), सना मलिक (अणुशक्ती नगर), श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.शंकर जगताप (चिंचवड), श्री. अशोकराव माने (हातकणंगले), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षण अधिनियम, २००९ नुसार राज्यातील खाजगी विनाअनुदानित इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये दुर्बल व वंचित घटकातील विद्यार्थ्यांना २५ टक्के ऑनलाईन पद्धतीने प्रवेश देऊन त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याची प्रभावी योजना शासन राबवित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील सर्व इंग्रजी माध्यमाच्या शाळांचा थकीत आरटीई शुल्क परतावा अडीच हजार कोटी इतका असून शासनाने अद्यापपर्यंत हा परतावा दिला नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच या शाळा चालकांकडून सदरहू थकीत परतावा मिळण्याकरीता अनेकदा मागणी करुन आंदोलनाचा इशारा देखील दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी शाळांचा थकीत परतावा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) सन २०१२-१३ ते सन २०२३-२४ या वर्षातील राज्य शासनामार्फत बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ अंतर्गत २५ टक्के प्रवेश प्रक्रियेमधील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्तीसाठी मागणी रु.२९६५.६१ कोटी असून शासनाने सन २०१२-१३ पासून आतापर्यंत रु.११८८.१८ कोटी इतका निधी खर्च केलेला आहे. यासंदर्भात संस्था चालकांकडून शैक्षणिक खर्चाची प्रतिपूर्ती मिळणेबाबत मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल केलेल्या आहेत. सद्य:स्थितीत प्रलंबित आरटीई शुल्काची रक्कम रु.१८१६.१० कोटी इतकी आहे. सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पीत करण्यात आलेला निधी वितरित करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात शेतकऱ्यांना पीक कर्ज विनाविलंब मिळणेबाबत

**(११) * ५७७ डॉ.राहूल पाटील (परभणी), डॉ.तानाजी सावंत (परांडा), श्री.चंद्रकांत ऊर्फ राजुभैय्या रमाकांत नवघरे (बसमत), श्री.आनंद तिडके (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनेक ठिकाणी बँकांकडून शेतकऱ्यांना पीक कर्ज वाटपाचे उद्दिष्ट दिले असतानाही बँकांकडून पीक कर्ज वाटप अत्यल्प व संथगतीने करण्यात येत असल्याने शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परभणी जिल्हा प्रशासनाने सन २०२४-२०२५ च्या रब्बी हंगामासाठी रू.७४८ कोटी इतके पीक कर्ज वाटपाचे उद्दिष्ट बँकांना दिले असून दिनांक ७ जानेवारी, २०२५ अखेरपर्यंत केवळ रू.१४८ कोटी ७४ लाखांचे (१९ टक्के) पीक कर्ज वाटप करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच धाराशिव जिल्हयातील राष्ट्रीयकृत बँका, जिल्हा बँका, व ग्रामीण बँकाना एकूण रू.६१८ कोटी ४६ लाख इतके पीक कर्ज वितरणाचे उद्दीष्ट दिले असून दिनांक ७ जानेवारी, २०२५ अखेर पर्यंत केवळ २१ टक्केच पीक कर्ज संबंधितांना वाटप करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, खरीपाच्या हंगामात बँका पिक कर्ज देण्यास टाळाटाळ करीत असल्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशावरुन ८ बँकावर गुन्हे दाखल करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, जिल्ह्यातील शेतकऱ्यांना बँकांकडून संथगतीने पीक कर्ज वाटप केल्याने शेतकऱ्यांना सावकारांकडून चढ्यादराने कर्ज घ्यावे लागते, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, शेतकऱ्यांना पीक कर्ज विनाविलंब मिळणेबाबत तसेच बँकांना नेमून दिलेले पीक कर्ज वाटपाची उद्दिष्टपूर्ती संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील :** (१) हे खरे नाही,

राज्यामध्ये सन २०२४-२५ साठी एकूण रुपये ७४,७८१ कोटी पीक कर्ज वाटपाचा लक्षांक असून दिनांक १५.०२.२०२५ पर्यंत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, सार्वजनिक क्षेत्र/खाजगी लघुवित्त बँका तसेच ग्रामीण बँकांमार्फत खरीप व रब्बी हंगामासाठी रु. ५८,१०५ कोटी (७८ टक्के) पीक कर्ज वाटप केले आहे.
(२), (३) व (४) हे खरे आहे.
(५) हे खरे नाही,

राज्यातील शेतकऱ्यांना बँकांकडून संथ गतीने पीक कर्ज वाटप केल्याने शेतकऱ्यांना सावकरांकडून चढ्या दराने कर्ज घ्यावे लागते यासंदर्भात विभागाकडे तक्रार प्राप्त नाही.
(६) मा.मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखालील खरीप आढावा सभेमध्ये राज्यातील शेतकऱ्यांना विहित मुदतीत पीक कर्ज देणेबाबतच्या सूचना बँकांना देण्यात आलेल्या आहेत. तसेच याबाबत वेळोवेळी राज्यस्तरीय बँकर्स समिती व सहकार आयुक्त यांचे स्तरावरुन वेळोवेळी आढावा घेण्यात येतो. तसेच दिनांक २७.०६.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील शेतकऱ्यांना निर्धारित लक्षांकाप्रमाणे बँकांमार्फत पुरेशा प्रमाणात व विहित वेळेत पीक कर्जपुरवठा होण्यासाठी तालुका स्तरावर स्थानिक विधानसभा सदस्य यांच्या अध्यक्षतेखाली तालुका पीक कर्जवाटप आढावा समितीची स्थापना करण्यात आलेली आहे.

-----------------

## छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील विभागीय क्रीडा संकुलाच्या विकासासाठी प्राप्त निधीचा गैरव्यवहार केल्याबाबत

**(१२) * ५०५ डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव), श्री.शंकर जगताप (चिंचवड), श्री.सुरेश धस (आष्टी), श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील विभागीय क्रीडा संकुलाच्या विकासासाठी प्राप्त निधीमधून कंत्राटी लिपिक व कर्मचाऱ्यांनी जवळजवळ रु.२१.५९ कोटी इतक्या रकमेचा गैरव्यवहार केल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या क्रीडा संकुलाच्या विकासासाठी स्थापन केलेल्या पालक मंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या बँक खात्यातून ही रक्कम कंत्राटी कर्मचाऱ्यांनी आपल्या खात्यात वळती करुन घेतली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या घोटाळ्यात नावाचा व स्वाक्षरीचा बनावट वापर, बँक खात्याला स्वत:चा मोबाईल क्रमांक जोडणे, नेटबँकींग सुरु करण्यासाठी बनावट ई-मेल आयडीचा वापर करणे व त्याआधारे कोट्यवधीचा निधी स्वत:च्या खात्यात वळवून मोठ्या प्रमाणात निधीचा गैरव्यवहार करुन त्यातून गाड्या, सोने, वस्तू, सदनिका, प्लॉट इत्यादींची खरेदी करण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी आर्थिक गुन्हे शाखेने जव्हार पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविला असून आरोपींना व यातील अन्य दोषींना अटक करण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची तात्काळ चौकशी करुन अपहारीत रकमेची वसुली करणेबाबत तसेच यातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दत्तात्रय भरणे :** (१),(२) व (३) होय खरे आहे.

(४), (५) व (६) पोलिस निरीक्षक, आर्थिक गुन्हे शाखा, छत्रपती संभाजीनगर यांचे पत्र क्र.आगुशा/गुन्हे तपास/ माहिती/२०२५-४३१ दिनांक ३१/१/२०२५ नुसार सदर गुन्ह्याच्या तपासात क्रीडा विभागाच्या एका कर्मचाऱ्यासह एकूण ११ आरोपींना अटक करण्यात आलेली असून क्रीडा विभागाच्या संबंधित कर्मचाऱ्यास निलंबित करण्यात आले आहे. अपहारीत रक्कमेतून खरेदी केलेल्या स्थावर आणि जंगम मालमत्ता पोलिसांकडून जप्त करण्यात आलेली असून सर्व आरोपींविरुद्ध सबळ पुरावे हस्तगत करून मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्याची पोलिस निरीक्षक, आर्थिक गुन्हे शाखा, छत्रपती संभाजीनगर यांच्यामार्फत कार्यवाही सुरू आहे.

-----------------

**राज्यातील ऊसतोड कामगारांच्या प्रलंबित मागण्यांसाठी प्रभावी कायदा करण्याबाबत**

**(१३) * २२५३ श्री.सुरेश धस (आष्टी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील साखर कारखान्यांसाठी शेतातील ऊस तोडणे, साळणे व त्यांच्या मोळ्या बांधून बैलगाडया, ट्रॅक्टर व ट्रकमध्ये माल भरून तो साखर कारखान्यांपर्यंत पोहोचविणे ही कामे करणाऱ्या ऊसतोड मजुरांची संख्या मोठी असून त्यांना वर्षातील केवळ ८ महिने काम मिळत असताना साखर कारखान्यांकडून मात्र योग्य वागणूक मिळत नसून त्यांचे शोषण होत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मजुरांच्या मजुरीसंदर्भात ऊस तोडणीचे दर ठरविण्यासाठी वापरली जाणारी वैयक्तिक पद्धत अत्यंत चुकीची व दोषपूर्ण असून त्यामुळे या मंजुरांवर अन्याय होत असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर मजुरांना विमा संरक्षण, त्यांच्या मुलांना दर्जेदार शिक्षण मिळणे, मजूर स्त्रियांवरील अत्याचार रोखणे तसेच ऊस तोडणीचे दर ठरविण्यासाठी वापरली जाणारी वैयक्तिक पद्धत बदलण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील :** (१), (२) व (३) गाळप हंगामात राज्यात सुमारे ९९ सहकारी साखर कारखाने व १०१ खाजगी साखर कारखान्यांमध्ये अंदाजे ८ लाख ऊसतोड मजूर ऊस तोडणीचे काम करतात.

ऊसतोड मजूर तोडणीसाठी साधारणत: ६ महिने कालावधीकरिता स्थलांतरित होत असतात.

ऊसाची तोडणी करुन शेतापासून कारखान्यापर्यंत ऊसाची वाहतूक करण्याची जबाबदारी ऊस उत्पादक शेतकऱ्यांची आहे. तथापि, महाराष्ट्रातील सर्व साखर कारखान्यांत ही जबाबदारी कारखान्यांकडून शेतकऱ्यांच्यावतीने पार पाडली जाते. साखर कारखान्यांना लागणाऱ्या मजुरांचा पुरवठा हा तोडणी मुकादम यांच्याशी करार करुन केला जातो.

ऊसतोड कामगार व मुकादम संघटनांच्या मागण्यांच्या अनुषंगाने ऊस तोडणी व वाहतूक दराबाबत ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे वतीने महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ लि., मुंबई यांचेस्तरावरून साखर उदयोगाचे प्रतिनिधी, साखरसंघाकडे नोंदणीकृत राज्यातील प्रमुख ऊस तोडणी व वाहतूक कामगार संघटना यांचे प्रतिनिधी यांचे मान्यतेने लवादाची नेमणुक केली जाते. सदर लवादामार्फत सामंजस्य करार करून ऊस तोडणी व वाहतूक दर निश्चित केले जातात. त्यानुसार ऊस तोडणी व वाहतूक शेतमजुरांचे मजुरीचे नवीन दर गाळप हंगाम २०२३-२४ ते २०२५-२६ या तीन वर्षांच्या हंगाम कालावधीकरिता निश्चित करण्यात आले आहेत. यामध्ये संपुष्टात आलेल्या करारावर ३४ टक्के वाढ तसेच मुकादम कमिशन मध्ये १ टक्का वाढ करुन तो २० टक्के इतका करण्यात आला आहे.

राज्यातील ऊसतोड कामगारांना विविध कल्याणकारी व सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ मिळवून देण्याकरिता सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अखत्यारितील लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ कार्यरत आहे.

सद्य:स्थितीत लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळामार्फत ऊस तोडणी मजुरांचा विमा उतरविणे, त्यांचे पाल्यांच्या शैक्षणिक सुविधेसाठी वसतिगृहे उभारणे, ऊसतोड मजुरांची नोंदणी करून त्यांना ओळखपत्र देणे व ऊसतोड कामगारांसाठी विविध कल्याणकारी व सामाजिक सुरक्षा योजना राबविणेबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात होणारी दूध भेसळ रोखण्याबाबत**

**(१४) * ३०७ श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.काशिनाथ महादु दाते सर (पारनेर), श्री.विक्रम पाचपुते (श्रीगोंदा), श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.प्रविण विरभद्रया स्वामी (सर) (उमरगा), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.सुरेश धस (आष्टी), श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मोठ्या प्रमाणात दुधामध्ये भेसळ होत असून यात आरोग्याला हानिकारक युरिया, हायड्रोजन पेरोक्साइड, फॉर्मेलिन, स्वयंपाकाचे तेल, डिटर्जंट, कॉस्टिक सोडा, साखर, मीठ इ. अनेक घातक घटकांचा समावेश होत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी जानेवारी, २०२५ मध्ये अन्न व औषध प्रशासनाने जवळपास १६२ दुधाचे सर्व्हेक्षण नमुने घेऊन ते भेसळ, रसायनांचे प्रमाण आणि गुणवत्ता तपासण्यासाठी अन्न सुरक्षा आणि मानके प्राधिकृत अन्न प्रयोगशाळेत पाठविण्यात आले असून सुमारे १०३ अधिकाऱ्यांना दुधाच्या गुणवत्तेची तपासणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागरिकांना भेसळयुक्त दुधामुळे अनेक गंभीर आजारांना सामोरे जावे लागत असून दुधातील भेसळ न थांबविल्यास देशातील लोकसंख्येला जीवघेण्या आरोग्य समस्यांना तोंड द्यावे लागण्याची चेतावणी वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन (WHO) ने भारतासाठी जारी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संपूर्ण प्रकरणी सखोल चौकशी करुन दुधातील भेसळ रोखणेसह यातील दोषींवर कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नरहरी झिरवाळ :** (१) अंशत: खरे आहे.

राज्यात अन्न व औषध प्रशासनामार्फत दिनांक ०१ एप्रिल, २०२४ ते दिनांक ३१ जानेवारी, २०२५ या कालावधीत दुधाचे एकूण ७३० नमुने विश्लेषणास घेण्यात आलेले असून त्यापैकी २८० नमुने प्रमाणित, ५० नमुने कमी दर्जाचे, ११ असुरक्षित घोषित झाले असून ३८९ नमुन्यांचे अहवाल प्रलंबित आहेत.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन (WHO) ने भारतासाठी अशा प्रकारची कोणतीही चेतावनी जारी केली नाही.

(४) राज्यात अन्न व औषध प्रशासनाने दि.१५.०१.२०२५ रोजी एकाचवेळी विविध ठिकाणांहून एकूण १०९४ दुधाचे सर्व्हेक्षण नमुने विश्लेषणासाठी घेतले होते. सदर अन्न नमुन्यांच्या विश्लेषण अहवालानुसार एकूण १२६ अन्न नमुने मानकांप्रमाणे नसल्याचे आढळून आले. त्यानुषंगाने उक्त प्रकरणांमध्ये दुधाचे कायदेशीर नमुने घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

दूध भेसळ निदर्शनास आल्यास संबंधितांवर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करून कायद्यांतर्गत कारवाई करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**जिल्हा परिषद व प्राथमिक शिक्षण संचालनालयाने शाळांच्या पोषण आहाराचे लेखापरिक्षण करण्याबाबत**

**(१५) * १२ श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती सरोज अहिरे (देवळाली), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.शिवाजी कर्डिले (राहुरी), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), डॉ.संजय कुटे (जळगाव जामोद), श्री.रमेश कराड (लातूर ग्रामीण), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.रविशेठ पाटील (पेण), श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), डॉ.विनय विलासराव कोरे (सावकर) (शाहूवाडी), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.राजन नाईक (नालासोपारा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.करण देवतळे (वरोरा), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व), डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.राहुल आवाडे (इचलकरंजी), श्री.राघवेंद्र (रामदादा) मनोहर पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अनिल पाटील (अमळनेर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेंतर्गत जिल्हा परिषद व प्राथमिक शिक्षण संचालनालय स्तरावरून देण्यात येणाऱ्या अनुदानातून शालेय विद्यार्थांना देण्यात येणाऱ्या पोषण आहारात अनियमितता झाल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यामुळे या योजनेच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी प्राथमिक शिक्षण संचालनालयाने सन २०२१ ते २०२४ या काळातील शाळांच्या पोषण आहाराचे लेखापरिक्षण (ऑडिट) करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुषंगाने पुणे येथील सनदी लेखापाल संस्थेची नियुक्ती करण्यात आली असून राज्यातील या योजनेअंतर्गत सर्व पात्र शाळांमध्ये निधीचा योग्य वापर, बँक पासबुक, कॅशबुकचा तपशील, तांदूळ साठा नोंद वही, उपयोगिता प्रमाणपत्र इत्यादी अनेक बाबींची तपासणी करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निर्णयानुसार योजनेस पात्र शाळांना एका वेबफॉर्मद्वारे माहिती भरण्याचे निर्देश देण्यात आले असून माहिती सादर न करणाऱ्या शाळाप्रमुखांवर दंडात्मक तसेच प्रशासकीय कार्यवाही करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या सर्व प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) हे खरे नाही.

केंद्र शासनाच्या निर्देशाप्रमाणे प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत प्राप्त शाळांचे सन २०२०-२४ या चार वर्षांच्या कालावधीतील नियमित लेखापरिक्षण करण्यात येत आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

सदर नियमित लेखापरिक्षणासाठी आवश्यक अभिलेखे विहित वेळेत सादर करण्याचे स्थायी आदेश आहेत. प्रस्तुत अभिलेखे विहित कालावधीत सादर करण्यासाठी दंडात्मक तसेच प्रशासकीय कारवाईची तरतूद करण्यात आली आहे. तथापि, आजरोजीपर्यंत कोणत्याही शाळाप्रमुखांवर सदरप्रमाणे कारवाई करण्यात आलेली नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शिक्षण हक्क कायद्यांतर्गत खाजगी शाळा प्रवेश नाकारत असल्याबाबत**

**(१६) * ३२८२ श्री.योगेश सागर (चारकोप)** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आर्थिक व सामाजिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना शिक्षण हक्क कायद्यांतर्गत खाजगी शाळांमध्ये २५ टक्के राखीव जागांवर प्रवेश देण्याबाबतच्या नियमात शासनाने बदल केल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उच्च न्यायालयाने राज्य शासनाच्या शिक्षण विभागाने आरटीई प्रवेशात केलेले बदल घटनाबाह्य ठरवून

खाजगी शाळांनी आधी दिलेले प्रवेश अबाधित ठेवून आरटीईअंतर्गत विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याचे आदेश दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार प्रवेशासाठी शिक्षण विभागाने काढलेल्या सोडतीनुसार प्रवेशपात्र विद्यार्थ्यांची निवड यादी जाहीर करून प्रवेशासाठी विहित मुदत व न्यायालयाच्या आदेशानंतरही काही खाजगी शाळांकडून आरटीई प्रवेश नाकारण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रवेशक्षमता पूर्ण झाल्यामुळे जागा वाढवून घेण्याची आवश्यकता, त्यासाठी लागणारी मान्यता, शिक्षकांची उपलब्धता व इतर सुविधा, शाळेला पूर्वकल्पना न देताच शाळा आरटीई प्रवेशाच्या संकेतस्थळावर जोडण्यात येणे इ.विविध कारणास्तव या निर्णयाची अंमलबजावणी करणे अडचणीचे ठरत असल्याबाबतचे निवेदन या शाळांनी शिक्षण विभागाकडे दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी करुन निर्णयाची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

आरटीई २५ टक्के अंतर्गत प्रवेश प्रक्रिया राबविण्याबाबतची दि.०९.०२.२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली अधिसूचना मा.उच्च न्यायालयाच्या दि.१९.०७.२०२४ रोजीच्या आदेशान्वये रद्द करण्यात आली आहे.

(३) होय, हे खरे आहे.

राज्यात औरंगाबाद येथील SOBM स्कुल यांनी रिट याचिका क्र.९३७५/२०२४ दाखल करून व पुणे येथील महिंद्रा इंटरनॅशनल स्कुल, हिंजवडी या शाळेने इंटरीम ॲप्लिकेशन दाखल केले असल्याने सन २०२४-२५ करीता आरटीई प्रवेशास मा.न्यायालयामार्फत स्थगिती देण्यात आली होती. संबंधित शिक्षणाधिकारी यांनी सदर शाळांतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांचे इतर शाळांमध्ये समायोजन केलेले आहे.

(४) व (५) होय, हे खरे आहे.

याबाबतचे निवेदन प्राप्त झाले होते. तथापि, जनहित याचिका ६१/२०२४ मध्ये दि.१९.०७.२०२४ रोजीच्या आदेशाच्या अनुषंगाने शिक्षण संचालक (प्राथमिक) यांनी दि.२९.०७.२०२४ रोजीच्या पत्रान्वये सर्व क्षेत्रिय कार्यालयांना शाळांनी कोणत्याही सबबीखाली आरटीई २५ टक्के प्रवेश नाकारल्यास मा.उच्च न्यायालयाच्या आदेशांचा अवमान होईल, याची जाणीव शाळांना करून देण्याबाबतच्या सूचना निर्गमित केलेल्या होत्या. तदनंतर शाळांनी आरटीई २५ टक्के अंतर्गत प्रवेश दिलेले आहेत. सद्य:स्थितीत आरटीई २५ टक्के प्रवेश प्रक्रिया पूर्वीप्रमाणे कार्यान्वित आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात अनेक ठिकाणी कृत्रिम पनीर (ॲनालॉग पनीर) ची होत असलेली विक्री

**(१७) * २३३८ श्री.विक्रम पाचपुते (श्रीगोंदा) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ॲनालॉग चीज (Analogue cheese ) हा पदार्थ महाराष्ट्रामध्ये अनेक ठिकाणी ॲनालॉग पनीर, आर्टीफिशिअल पनीर किंवा फेक पनीर या नावाने विक्री केला जातो हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ॲनालॉग चीज / पनीर बनविण्यासाठी केवळ २५ ते ३० टक्के दुधाची गरज नसून यामध्ये प्रमुख घटक व्हेजीटेबल फॅट व पाम ऑईल याचा वापर केला जात असून राज्यात एकूण पनीर विक्रीच्या जवळजवळ ७५ टक्के ॲनालॉग चीज/पनीरची विक्री होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशाप्रकारे विक्री करण्यात येणाऱ्या पनीर/चीजमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून अशा विक्रीस शासनाची मान्यता आहे काय,

(४) असल्यास, हे चीज/पनीर आरोग्यास धोकादायक असतानाच याचा विपरीत परिणाम दुग्धव्यवसायावर देखील होत असून दूध उत्पादक शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन अशा प्रकारच्या कृत्रिम पनीर / चीज विक्रीवर बंदी घालणे, जनजागृती करणे, दुग्ध व्यवसाय वाचविणे तसेच संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नरहरी झिरवाळ :** (१) व (२) व (३) अन्न सुरक्षा आणि मानके (अन्न उत्पादने मानके आणि अन्न मिश्रीके) नियमन, २०११ मधील "Appendix A" मधील २.१ फूड कॅटेगरी सिस्टम डीस्क्रीपशन -II मधील १.६.५ मधील व्याखेनुसार "चीज ॲनालॉग्स" अशी उत्पादने जी चीजसारखी दिसतात, परंतु ज्यामध्ये दुधाची फॅट अंशतः किंवा पूर्णपणे इतर फॅट्सने बदलली जातात, यामध्ये इमिटेशन चीज, इमिटेशन चीज मिक्स आणि इमिटेशन चीज पावडर यांचा समावेश आहे.

अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरण, नवी दिल्ली यांनी ॲनालॉग चीज/ॲनालॉग पनीर या अन्न पदार्थाच्या विक्री व उत्पादनाकरिता परवानगी दिली असून त्याकरीता संबंधित आस्थापनेने परवाना घेणे आवश्यक आहे.

तसेच, ग्राहकांची फसवणूक रोखण्यासाठी अन्न सुरक्षा आणि मानके प्राधिकरण, नवी दिल्ली यांनी सदर अन्न पदार्थाच्या लेबलवर (अन्न उत्पादने मानके आणि अन्न मिश्रीके) नियमन, २०११ मधील प्रकरण २.१ (दुग्ध उत्पादने आणि ॲनालॉग्स) मधील नियमन २.१.१ (५) (ब) नुसार अन्नपदार्थांमध्ये समाविष्ट केलेले घटक पदार्थ नमूद करणे अनिवार्य आहे.
(४) दूध व दुग्धजन्य पदार्थ/पनीर यात होणाऱ्या भेसळीमुळे दुधाचा / दुग्धजन्य पदार्थाचा कृत्रिम फुगवटा तयार होवून दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या दुधास कमी भाव मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही.
(५) अन्न सुरक्षा व मानके, कायदा २००६ व त्याखालील नियम व नियमातील तरतुदींचे उल्लंघन आढळल्यास कायद्यातील तरतुदीनुसार अन्न व औषध प्रशासनाकडून संबंधित अन्न व्यवसायिकाविरुध्द कारवाई करण्यात येते. पनीर व चीज ॲनालॉग / पनीर ॲनालॉग यांचेमधील फरक जाणून घेण्याबाबत लोकांना शिक्षित करण्यासाठी अन्न व औषध प्रशासनामार्फत माहिती, शिक्षण आणि संप्रेषण (IEC) अंतर्गत सोशल मीडिया, टीव्ही आणि स्थानिक केबल टीव्ही मार्फत जनजागृती केली जाते.

आयुक्त, अन्न व औषध प्रशासन यांनी दि. १३.१२.२०२३ व दि.२१.०२.२०२५ रोजीच्या शासन ज्ञापनान्वये पनीर व चीज ॲनालॉग/ पनीर ॲनालॉग या अन्नपदार्थांचे नियमित अन्न नमुने मोहिम राबविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

दूध व दुग्धजन्य पदार्थात होणाऱ्या भेसळीवर कारवाई / प्रतिबंध करण्यासाठी शासनाने शासन निर्णय, दि.२८.०६.२०२३ अन्वये "अपर जिल्हाधिकारी" यांचे अध्यक्षतेखाली जिल्हानिहाय दूध भेसळ प्रतिबंध समिती गठीत केल्या आहेत. उक्त समितीमार्फत धडक मोहिमा राबवून भेसळखोरांविरोधात कायदेशीर कारवाई करण्यासाठी आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, सर्व जिल्ह्याचे जिल्हाधिकारी, सर्व जिल्हा पोलीस अधिक्षक व अधिनस्त यंत्रणेस निर्देश देण्यात आले आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात इयत्ता १ ली ते १० पर्यंतच्या विद्यार्थ्यांचे दप्तराचे ओझे कमी करण्याबाबत

**(१८) * १३७५ श्री.संजय देरकर (वणी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने इयत्ता १ ली ते १० पर्यंतच्या विद्यार्थ्यांचे दप्तराचे ओझे कमी करण्याबाबतचा निर्णय घेतला असून याबाबत राज्यातील सर्व शाळांना सूचना देण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निर्णय केवळ कागदावरच असून प्रत्यक्षात मात्र त्याची अंमलबजावणी होत नसल्याने विद्यार्थ्यांच्या पाठीवरील दप्तराचे ओझे अद्यापही कमी झाले नसल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना घरापासून एक ते दोन किलोमीटर अंतर पार करुन शाळेत जावे लागत असल्यामुळे त्यांच्या पाठीवरील आठ ते दहा किलो दप्तराच्या ओझ्यामुळे त्यांना विविध शारीरिक आजारांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) अंशत: खरे आहे.

(२), (३) व (४) शासन निर्णय दि. ०८.०३.२०२३ अन्वये सन २०२३-२०२४ करिता इयत्ता २ री ते इयत्ता ८ वी च्या पाठ्यपुस्तकांमध्ये वह्यांची पाने समाविष्ट करण्याबाबत व पाठ्यपुस्तके एकात्मिक स्वरूपात एकूण ४ भागांमध्ये विभागून तयार करण्याबाबत प्रायोगिक तत्वावर निर्णय घेण्यात आला होता. परंतु, याबाबत अपेक्षित फलनिष्पत्ती प्राप्त न झाल्यामुळे शासन निर्णय दि. २५.०१.२०२५ अन्वये सदरचा प्रयोग पुढे कायम न ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र राज्य पणन महामंडळ व आदिवासी विकास महामंडळ या संस्थेने खरेदी केलेल्या धानाची थकीत देणी अदा करण्याबाबत

**(१९) * २१०७ श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.रामदास मसराम (आरमोरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयात महाराष्ट्र राज्य पणन महामंडळ व आदिवासी विकास महामंडळ या अभिकर्ता संस्थांकडून अनुक्रमे ४३ व १८ आधारभूत धान खरेदी केंद्रावर शेतकऱ्यांकडून धान खरेदी करण्यात आले असून महाराष्ट्र राज्य पणन महामंडळाने एकूण ४ लक्ष १३ हजार ६२० क्विंटल धानाची खरेदी केली तसेच शेतकऱ्यांना देय असलेल्या एकूण ९५ कोटी १३ लक्ष २७ हजार रुपयांपैकी केवळ ५ कोटी १९ लक्ष रुपयांचे देणी अदा केल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच केंद्र शासनाच्या आधाभूत धान्य खरेदी योजनेअंतर्गत पणन खरीप हंगाम २०२४-२५ मध्ये मार्केटिंग फेडरेशनच्यावतीने देसाईगंज (जि.गडचिरोली) येथील खरेदी विक्री संस्थेच्यावतीने हमीभावने धान खरेदी केंद्र सुरु करण्यात येऊन कुरुड किनारा देसाईगंज वडसा व कोरेगाव केंद्रावर दिनांक ११ डिसेंबर, २०२४ पासून हमीभावाने पाच लाख बत्तीस हजार चौऱ्याऐंशी क्विंटल धान खरेदी केले असून धानाची विक्री केलेल्या दीड हजार शेतकऱ्यांचे बारा कोटीचे चुकारे अद्यापही मिळालेले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या आधारभूत खरेदी योजना खरीप हंगाम २०२४-२०२५ मध्ये २२ धान खरेदी केंद्रावर ११,५६९ शेतकऱ्यांकडून २३०० रुपये प्रति क्विंटल या प्रमाणे ३ लाख ६७ हजार ६४१ क्विंटल धान खरेदी करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाकडून प्रति क्विंटल प्रमाणे ८४ कोटी ५५ लाख ७४ हजार ३०० रुपये पैकी शासनाकडून १३ कोटी ५४ लाख ४० हजार ५६० रुपये प्राप्त झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार धानाचे ७१ कोटी १ लाख ३३ हजार ७४० इतकी रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग करणे तसेच महाराष्ट्र राज्य पणन महामंडळ व आदिवासी विकास महामंडळ या दोन्ही अभिकर्ता संस्थेने खरेदी केलेल्या धानाची थकीत देणी शेतकऱ्यांना देऊन त्यांची आर्थिक अडचण दूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार :** (१) अंशत: खरे आहे.

चंद्रपूर जिल्ह्यात महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महामंडळ व आदिवासी विकास महामंडळ या अभिकर्ता संस्थाकडून अनुक्रमे ४३ व २६ खरेदी केंद्रावर धान खरेदी करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र राज्य पणन महामंडळाकडुन माहे जानेवारी २०२५ अखेर १७,७९७ शेतकऱ्यांकडुन ४,४१,२३८.६७ क्विंटल धान खरेदी करण्यात आला.

सदर खरेदी केलेल्या धानाच्या चुकाऱ्याची एकुण रक्कम रु. १०१.४८ कोटी इतकी होते. त्यापैकी रु. ९३.८५ कोटी रुपयांचे चुकारे फेब्रुवारी २०२५ च्या पहिल्या आठवड्यात संबंधित शेतकऱ्यांना अदा करण्यात आले आहेत. उर्वरित शेतकऱ्यांची चुकारे अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२) अंशत: खरे आहे.

कुरुड किन्हाळा, वडसा (देसाईगंज) व कोरेगाव या धान खरेदी केंद्रावर ५८,४११.६० क्विंटल धान खरेदी करण्यात आले असुन खरेदी केलेल्या धानाच्या एकुण रक्कम रु. १३.४२ कोटी पैकी रु. १०.६२ कोटींचे चुकारे अदा करण्यात आले आहेत. उर्वरित चुकारे अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) अंशत: खरे आहे.

धान खरेदीनुसार दैनदिन अहवालाची स्थिती बदलत असते. गडचिरोली जिल्ह्यातील दिनांक ०३ मार्च, २०२५ अखेर २२ धान खरेदी केंद्रावर १२,१०५ शेतकऱ्यांकडुन ३,८६,१४८.७० क्विंटल धानाची खरेदी करण्यात आली आहे.

(४) व (५) गडचिरोली जिल्ह्यात पणन महासंघामार्फत दिनांक ०३ मार्च, २०२५ रोजीपर्यंत खरेदी करण्यात आलेल्या धानाची एकुण किंमत रु.८८.८१ कोटी इतकी होते. त्यापैकी रु. ७२.४३ कोटींचे चुकारे अदा करण्यात आले आहेत. उर्वरित रकमेचे चुकारे अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच आदिवासी विकास महामंडळामार्फत गडचिरोली जिल्ह्यात दिनांक ०६ मार्च, २०२५ रोजीपर्यंत खरेदी करण्यात आलेल्या धानाची एकुण किंमत रु.२८८.३४ कोटी इतकी होते. त्यापैकी रु २४९.२१ कोटींचे चुकारे अदा करण्यात आलेले आहेत. उर्वरित रकमेचे चुकारे अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात अनेक ठिकाणी रेशनकार्ड मॅनेजमेंट सिस्टीम बंद असल्याबाबत

**(२०) * ३१९ श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला), श्री.करण देवतळे (वरोरा), श्री.सुहास बाबर (खानापूर), श्री.सत्यजित देशमुख (शिराळा), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.राजेंद्र गावित (पालघर), डॉ.संजय कुटे (जळगाव जामोद), श्री.रमेश कराड (लातूर ग्रामीण), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर), डॉ.विनय विलासराव कोरे (सावकर) (शाहूवाडी), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.शंकर जगताप (चिंचवड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.राहूल कुल (दौंड), डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.आनंद तिडके (नांदेड दक्षिण), डॉ.राहूल आहेर (चांदवड), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.गोपिचंद पडळकर (जत), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.राहुल आवाडे (इचलकरंजी), श्री.राघवेंद्र (रामदादा) मनोहर पाटील (धुळे ग्रामीण),**

**श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अनेक ठिकाणी अन्न नागरी पुरवठा विभागामार्फत सुरु असलेली रेशनकार्ड मॅनेजमेंट सिस्टीम (RCMS) ही वेबसाईट गत दोन-तीन महिन्यांपासून बंद आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच रेशन दुकानात बसविण्यात आलेल्या ई-पॉज मशिन मधील तांत्रिक अडचणी, सर्व्हर समस्या तसेच थम्ब कन्हेक्टीव्हीच्या समस्येमुळे धान्य पुरवठा बंद झाला असून राज्यात जवळजवळ २५ लाख शिधापत्रिकाधारक यामुळे बाधित झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यामुळे पात्र शिधा पत्रिकाधारक रेशन धान्यापासून वंचित राहत असून नवीन शिधापत्रिका काढणे, नाव कमी करणे वा वाढविणे, उत्पन्नाचे निकष, दुबार शिधापत्रिका काढणे, आधार संबंधित कामे, वैद्यकीय उपचारासाठी लागणारे दाखले इ. अनेक कामे प्रलंबित असल्यामुळे पात्र शिधापत्रिकाधारकांना शासनाच्या योजनांचा लाभ घेण्यात अनेक अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, वेबसाईट बंद असल्यामुळे बायोमेट्रीकच्या माध्यमातून मिळणारे धान्य देखील देण्यात येत नसून पारदर्शकतेचा अभाव व धान्याचा काळाबाजार होत असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदरहू वेबसाईट तात्काळ सुरु करणेबाबत अनेक नागरिकांनी व लोकप्रतिनिधींनी शासनास मागणी करुनही त्याची अंमलबजावणी झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, या सर्व प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर वेबसाईट तात्काळ सुरु करणे, ई-पॉज मशिन, सर्व्हर, थम्ब कन्हेक्टीव्हीटीबाबत तांत्रिक अडचणी दूर करुन सुरळीत धान्य पुरवठा करणेबाबत तसेच यातील दोषींवर कारवाई करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार :** (१), (२) व (३) होय, हे अंशत: खरे आहे. विभागातील RCMS व AePDS आणि इतर प्रणाली केंद्र शासनाच्या NIC क्लाउडवर स्थलांतरीत (Cloud Migration) करण्याची प्रक्रिया माहे, डिसेंबर, २०२४ मध्ये सुरु असल्याने ई-पॉस मशिनद्वारे अन्नधान्य वितरणास व शिधापत्रिकासंबंधित ऑनलाईन कामकाज करताना तांत्रिक अडचणी आल्या. तसेच, केंद्र शासनाच्या आधार प्रणालीमध्ये देशपातळीवर तांत्रिक समस्या असल्याने लाभार्थ्यांचे आधार प्रमाणीकरण करताना अडचणी आल्या. सद्य:स्थितीत विभागातील प्रणालींचे Cloud Migration ची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून तांत्रिक अडचणी दूर करण्यात आल्या आहेत. माहे डिसेंबर, २०२४ व जानेवारी, २०२५ मध्ये सरासरी ९२% अन्नधान्याचे वितरण लाभार्थ्यांना करण्यात आले आहे.
(४) नाही, हे खरे नाही.
(५) हे अशंत: खरे आहे. विभागातील प्रणाली सुरळीत करण्याबाबत लोकप्रतिनिधी व नागरिकांकडून मागणी करण्यात आली. त्याअनुषंगाने केंद्र शासनाच्या राष्ट्रीय सूचना केंद्र (NIC) यांना उचित सूचना देण्यात आल्या आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२१) * ८६३ श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला), श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील बेरोजगारी दूर करण्यासाठी शासकीय, निमशासकीय, खाजगी, औद्योगिक क्षेत्रात रोजगार निर्मिती तसेच एमएसएमई क्षेत्राला प्रोत्साहन देण्याबाबत शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(२) असल्यास, राज्यात हजार पुरुषांमागे ५२ आणि हजार महिलांमागे ६० व्यक्ती बेरोजगार असून भारतीय रिझर्व्ह बँकेने जाहिर केलेल्या आकडेवारीनुसार राज्यात बेरोजगारीचे प्रमाण अधिक असल्याचेही माहे डिसेंबर, २०२४ च्या सुमारास

निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, केंद्र शासनाच्या कामगार व रोजगार मंत्रालयाच्या पोर्टलवर नागपूर, चंद्रपूर, यवतमाळ, बुलढाणा, नाशिक, अमरावती यांसह अनेक जिल्ह्यांतील सुमारे २४.५१ लाख बेरोजगार युवकांनी नोकरीसाठी नोंदणी केली असून पुण्यातील आयटी कंपन्यांमध्ये देखील तीन हजारांपेक्षा जास्त बेरोजगार अभियंते नोकरीच्या प्रतिक्षेत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन राज्यात अधिकाधिक रोजगार निर्मितीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा :** (१) उद्योग विभागामार्फत राज्यातील शहरी व ग्रामीण क्षेत्रातील सुशिक्षित युवक-युवतींची वाढती संख्या व उद्योग, व्यवसाय क्षेत्रात राज्यात विविध क्षेत्रात उपलब्ध होत असलेल्या स्वयंरोजगार व रोजगाराच्या नवीन संधी विचारात घेऊन उद्योजकतेला चालना देणारी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना दि. ०१ ऑगस्ट, २०१९ पासून राबविण्यात येत आहे.

उद्योग संचालनालयामार्फत सुक्ष्म व लघु उद्योगांना संशोधन व विकास, पॅकेजिंग व चाचणी तसेच प्रशिक्षण, सामाईक जलनिस:रण, सामाईक प्रक्रिया या सामायिक सुविधा उपलब्ध करुन त्यांचे सक्षमीकरण व सर्वांगीण विकासासाठी महाराष्ट्र राज्य औद्योगिक समूह विकास योजना (MSICDP) व केंद्र शासनाची सुक्ष्म, लघु उपक्रम - समूह विकास योजना (MSE-CDP) योजनांची अंमलबजावणी केली जाते.

औद्योगिक दृष्ट्या अविकसित व विकसनशील भागात मोठ्या प्रमाणात औद्योगिक गुंतवणूक होऊन रोजगार निर्मिती साठी सामुहिक प्रोत्साहन योजने अंतर्गत सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना भांडवली अनुदान, व्याज अनुदान, विद्युत कर अनुदान इत्यादी विविध प्रोत्साहने मंजूर करण्यात येतात
(२) भारतीय रिझर्व्ह बँकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या अहवालानुसार मध्ये राज्यातील बेरोजगारीचे प्रमाण खालीलप्रमाणे आहे:-

**(प्रति हजार)**

| **शहरी (२०२३-२४)** | **पुरुष** | **स्त्रिया** | **एकूण (Overall)** |
|---|---|---|---|
| महाराष्ट्र | ४९ | ६० | ५२ |
| भारत | ४४ | ७१ | ५१ |

| **ग्रामीण (२०२३-२४)** | **पुरुष** | **स्त्रिया** | **एकूण (Overall)** |
|---|---|---|---|
| महाराष्ट्र | २८ | ११ | २२ |
| भारत | २७ | २१ | २४ |

उपलब्ध आकडेवारीनुसार राज्यातील बेरोजगारीचे एकूण प्रमाण राष्ट्रीय सरासरी एवढे आहे.
(३) केंद्र शासनाच्या कामगार व रोजगार मंत्रालयाच्या पोर्टलवरील आकडेवारीनुसार सन २०२४-२५ मध्ये माहे जानेवारी, २०२५ अखेर सदर पोर्टलवर नोंदणी केलेल्या महाराष्ट्रातील उमेदवारांची संख्या सुमारे २८.५० लक्ष इतकी आहे.
(४) राज्यातील तरुण वयोगटातील उमेदवारांना अत्याधुनिक तंत्रज्ञानानुरुप कौशल्य प्रशिक्षणाच्या आधारे रोजगारक्षम बनविण्याच्या दृष्टीने कौशल्य विकास कार्यक्रम सुरु करण्यात आला आहे. सदर कार्यक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता या स्वतंत्र विभागाची स्थापना करण्यात आली आहे.

केंद्र व राज्य शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या कौशल्य विषयक योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरीता उक्त विभागाच्या अधिपत्याखाली महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीची स्थापना करण्यात आली. सदर सोसायटीमार्फत राज्यातील उमेदवारांना विविध क्षेत्रातील अभ्यासक्रमांचे सूचीबद्ध प्रशिक्षण संस्थांच्या माध्यमातून

अल्पमुदतीचे प्रशिक्षण देवून रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यात येतात. तसेच, सोसायटीमार्फत प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना व उपजीविकेसाठी कौशल्य संपादन ज्ञान जागरुकता अभियान (SANKALP) ह्या केंद्र पुरस्कृत योजना आणि प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान (प्रमोद महाजन- ग्रामीण कौशल्य केंद्र व आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र) ह्या राज्य शासन पुरस्कृत योजना व किमान कौशल्य विकास केंद्र ही जिल्हा पुरस्कृत योजना राबविण्यात येत आहे.

सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार / स्वयंरोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी नियोक्ते कारखानदार, व्यापारी व सुशिक्षित बेरोजगार यांना संयुक्त व्यासपीठ उपलब्ध होण्याच्या दृष्टीने शासनामार्फत रोजगार मेळावे आयोजित करण्यात येतात. त्याकरीता नोकरीसाठी इच्छुक उमेदवारांची तसेच नियोक्त्यांच्या नोंदणीसाठी विभागामार्फत ऑनलाईन सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

दि.११.०२.२००४ च्या शासन निर्णयान्वये बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्था स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली असून दि. २८.०८.२०२४ च्या शासन निर्णयान्वये बेरोजगारांच्या सहकारी सेवा सोसायट्यांना रु.१०.०० लक्ष पर्यंतची कामे विना निविदा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

राज्यातील युवकांना त्यांच्या शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देऊन त्यांची रोजगार मिळण्याची क्षमता वाढविण्याकरीता दि. ०९.०७.२०२४ च्या शासन निर्णयान्वये "मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजना" कार्यान्वित करण्यात आली आहे. सदर योजनेंतर्गत १८ ते ३५ वर्षे वयोगटातील उमेदवारांना शासकीय/निमशासकीय/खाजगी आस्थापनांत ६ महिन्यांसाठी कार्यप्रशिक्षणाची संधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. त्याकरीता उमेदवारांसाठी तसेच मनुष्यबळाची आवश्यकता असलेल्या शासकीय/निमशासकीय/खाजगी आस्थापनांसाठी विभागाच्या संकेतस्थळावर नोंदणीची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सदर योजनेंतर्गत इयत्ता बारावी उत्तीर्ण प्रशिक्षणार्थींना प्रतिमाह ₹ ६,०००/-, आय.टी. आय./पदविका प्राप्त प्रशिक्षणार्थींना प्रतिमाह ₹ ८,०००/- व पदवी/पदव्युत्तर पदवी प्राप्त प्रशिक्षणार्थींना प्रतिमाह ₹ १०,०००/- इतके विद्यावेतन अनुज्ञेय करण्यात आले आहे. सदर विद्यावेतन प्रशिक्षणार्थींच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट जमा होणार आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**सोयाबीन व मूग पिकाला योग्य हमीभाव देण्याबाबत**

**(२२) * २४० श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.गजानन लवटे (दर्यापूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.प्रविण विरभद्रया स्वामी (सर) (उमरगा), श्री.गोपिचंद पडळकर (जत), श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव), श्री.राजेंद्र गावित (पालघर), श्री.राणाजगजितसिंह पाटील (तुळजापूर), श्री.रमेश कराड (लातूर ग्रामीण), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.उमेश ऊर्फ चंदु यावलकर (मोर्शी), डॉ.तानाजी सावंत (परांडा), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.संजय देरकर (वणी), श्री.करण देवतळे (वरोरा), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.सत्यजित देशमुख (शिराळा), श्री.संदिप क्षीरसागर (बीड), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.सुरेश धस (आष्टी), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.सिध्दार्थ खरात (मेहकर), डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सर्वत्र शेतकऱ्यांचे सोयाबीन व मूग हमीभावाने खरेदी करण्यात अनेक अडचणी येत असून यात सोयाबीन शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान व मनस्ताप होत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विविध तांत्रिक अडचणी, ५० किलोची पोती उपलब्ध नसणे, नाफेडकडून बारदाणांचा पुरवठा न होणे, सोयाबीनमध्ये डागी माती नसणे, आर्द्रता १२ च्या आत असणे, FAQ गुणवत्तेचा सोयाबीन असणे, अपेक्षित हमीभाव न मिळणे, ऑनलाईन नोंदणी, अनेक खरेदी केंद्रे बंद इत्यादी अनेक कारणांस्तव शेतकऱ्यांचा सोयाबीन विक्रीच्या प्रतिक्षेत

आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त कारणास्तव प्रलंबित राहिलेल्या सोयाबीन खरेदीची मुदत दिनांक १२ जानेवारी, २०२५ पर्यंत वाढविण्यात येऊनही अद्याप हजारो शेतकरी सोयाबीन विक्रीपासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाच्या खरेदी धोरणात व जाचक अटींमध्ये आवश्यक ते बदल न केल्याने, निर्यात धोरण तसेच हमीभाव इ. अनेक कारणास्तव शेतकऱ्यांना त्यांचे सोयाबीन खुल्या बाजारात कमी दराने विक्री करावे लागत असून अनेक ठिकाणी शेतकऱ्यांना FAQ चा धाक दाखवून त्यांच्याकडून अवैध मार्गाने पैसे लुटण्याचा प्रकार होत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, चिखली (जि.बुलढाणा) येथे बारदानाअभावी सोयाबीन खरेदी बंद असल्यामुळे ताटकळत बसलेल्या श्री.ज्ञानेश्वर दिनकर साबळे (रा.डोंगरी, शेवली) या शेतकऱ्याने अंगावर पेट्रोल ओतून आत्मदहनाचा प्रयत्न केल्याची घटना दिनांक ४ जानेवारी, २०२५ रोजी निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, या सर्व प्रकरणी शासनाने चौकशी करुन सोयाबीन व मूग उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१), (२), (३) व (४) हे अंशत: खरे आहे.

केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार हमीभावाने सोयाबीन खरेदी प्रक्रिया राबविण्यासंदर्भात राज्यात एकूण १४,१३,२७० मे.टन खरेदीचे उद्दिष्ट देण्यात आले होते. केंद्र शासनाच्या सर्वसाधारण गुणवत्तेचा (FAQ) व शेतमालाची आर्द्रता १२ टक्क्यांपेक्षा कमी असलेला शेतमाल खरेदी करणे अनिवार्य आहे.

सोयाबीन, मूग व उडिद खरेदीसाठी दि.१.१०.२०२४ पासून ऑनलाईन शेतकरी नोंदणी सुरु केली असून सदर मुदत दिनांक ६/१/२०२५ पर्यंत वेळोवेळी वाढविण्यात आली. त्यासाठी नाफेडद्वारे ४०३ व एनसीसीएफद्वारे १५९ अशी एकूण ५६२ केंद्रावर सोयाबीन खरेदी सुरु करण्यात आली.

राज्यात दिनांक १५.१०.२०२४ पासून सोयाबीनची खरेदी प्रक्रिया सुरू करण्यात आली असून खरेदीचा ९० दिवसांचा कालावधी दिनांक १३.०१.२०२५ पर्यंत होता. मात्र शेतकरी नोंदणीचे प्रमाण विचारात घेऊन खरेदी प्रक्रियेस केंद्र शासनाच्या मान्यतेने प्रथम मुदतवाढ दि.३१.०१.२०२५ पर्यंत व दुसरी मुदतवाढ दि.०६.०२.२०२५ पर्यंत देण्यात आली आहे.

सोयाबीन मोठया प्रमाणात खरेदी होत असल्याने तसेच नाफेड कार्यालयाने प्रथमच या वर्षी ५३० ग्रॅम वजनाचा बारदाणा वापरण्याचे सूचना दिल्याने सदर निकषांचा बारदाण बाजारात उपलब्ध नसल्याने काही कालावधीकरीता बारदाण्याचा तुटवटा निर्माण झाला. यासंदर्भात शेतकऱ्यांनी त्यांच्याकडे सुस्थितीत असलेला बारदाण्यामध्ये सोयाबीन खरेदीसाठी आणल्यास तो स्वीकारण्यात यावा व बारदाणा उपलब्ध झाल्यानंतर तो शेतकऱ्यांना देण्याबाबत राज्यस्तरीय नोडल संस्थांना निर्देश देण्यात आले. तसेच बारदाणा खरेदीबाबत राज्यस्तरीय नोडल संस्थांना निर्देश देऊन वेळीच बारदाणा पुरवठा सुरळीत करण्यात आला.

राज्यात दिनांक ०६.०२.२०२५ अखेर एकूण ५,११,६५७ शेतकऱ्यांकडून ११,२१,३८५ मे.टन सोयाबीन खरेदी करण्यात आली असून सदर खरेदी ही इतर राज्यापेक्षा जास्त व राज्यातील आतापर्यंतची सर्वाधिक सोयाबीन खरेदी आहे.

त्याचप्रमाणे दि.०६.०२.२०२५ अखेर ५२३ शेतकऱ्यांकडून ५८६.६५ मे. टन मूग खरेदी करण्यात आला. मूगाचे बाजारभाव हमीभावापेक्षा जास्त असल्याने शेतकऱ्यांचा अल्प प्रतिसाद मिळाला.

(५) हे अंशत: खरे आहे.

चिखली (जि.बुलढाणा) येथे खरेदी केंद्रवर बारदाणा अभावी सोयाबीन खरेदी बंद नव्हती. श्री.ज्ञानेश्वर दिनकर साबळे (रा.डोंगरी शेवली) यांनी विक्री करीता आणलेले सोयाबीन FAQ गुणवत्तेच्या निकषाप्रमाणे नसल्याने सदर शेतकऱ्याचे सोयाबीन परत करण्यात आले होते. त्यामुळे सदर शेतकऱ्याने खरेदी केंद्रावर गोंधळ घालुन खरेदी बंद पाडली होती.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शाळांमध्ये मराठी विषय सक्तीचा करण्याबाबत

**(२३) * ३४ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.सिध्दार्थ खरात (मेहकर), श्री.बाबुराव कदम-कोहळीकर (हदगाव), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.हारुन खान (वर्सोवा), श्री.महेश सावंत (माहिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.अनंत (बाळा) नर (जोगेश्वरी पूर्व), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.सुहास बाबर (खानापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व शाळांमध्ये मराठी विषय सक्तीचा करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निर्णयाची अंमलबजावणी बऱ्याच शाळांमध्ये होत नसून अंमलबजावणीबाबतचा आढावा शासनाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सीबीएसई, आयसीएसई आणि इतर बोर्डांच्या शाळांमध्ये मराठी शिकविणाऱ्या शिक्षकांची गुणवत्ता व पात्रता तपासण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, या निर्णयाची अंमलबजावणी न करणाऱ्या शाळांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) व (४) - राज्यातील सर्व माध्यमांच्या व राज्य मंडळाव्यतिरिक्त अन्य मंडळांच्या शाळांमध्ये मराठी भाषेचे अध्यापन व अध्ययन सक्तीचे करण्याबाबत सविस्तर सूचना शासन परिपत्रक दि. २८/०२/२०२४ द्वारे देण्यात आल्या असून त्यानुसार अशा शाळांमधील मराठी भाषेच्या अध्यापन व अध्ययनाच्या गुणवत्तेबाबत तपासणी करून उचित कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात प्राध्यापक भरती प्रलंबित असल्याबाबत

**(२४) * ४७ श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.बाबासाहेब देशमुख (सांगोले), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.सुरेश धस (आष्टी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.प्रदिप जैस्वाल (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सार्वजनिक विद्यापीठे आणि अनुदानित महाविद्यालये तसेच अकृषी विद्यापीठांमधील प्राध्यापक, सहाय्यक प्राध्यापक व इतर कर्मचाऱ्यांची हजारो पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाने जाहिर केलेले नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण राज्यात लागू करण्यात आले असून त्यानुसार प्राध्यापकांसह शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरणे आवश्यक असून विद्यापीठ अनुदान आयोगाने ७५ टक्के जागा भरण्याचे आदेश शासनाला दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तब्बल १२५२७ रिक्त जागांपैकी ४३०० प्राध्यापकांची पदे भरण्याचा प्रस्ताव उच्च व तंत्रशिक्षण विभागाने वित्त विभागाकडे सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील अकृषी विद्यापीठातील प्राध्यापक भरतीबाबत मान्यता तसेच अन्य तांत्रिक प्रक्रिया पूर्ण करुन जाहिरात प्रसिध्द करण्यात आली असून ही प्रक्रिया अंतिम टप्प्यात असताना विद्यापीठांचे मा.कुलपती यांचेकडून या भरती

प्रक्रियेस काही अटी शर्तींच्या पुर्ततेच्या अधिन राहून स्थगिती देण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, मोठ्या प्रमाणात रिक्त असलेल्या पदांमुळे ही कामे सीएचबीधारकांकडून तात्पुरत्या स्वरुपात पार पाडण्यात येत असून त्यांचे देखील मानधन अत्यंत अपूरे असल्यामुळे सीएचबीधारकांना आर्थिक संकटाचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, यामुळे विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणात शैक्षणिक नुकसान होत असून रिक्त पदे तातडीने भरण्यासंदर्भात अनेक स्तरावरुन मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(७) असल्यास, या सर्व प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :**(१) राज्यातील सार्वजनिक विद्यापीठे आणि अनुदानित महाविद्यालये येथील शिक्षकीय व शिक्षकेतर पदे सेवानिवृत्ती, राजीनामा, मृत्यू इ.कारणांमुळे रिक्त आहेत, हे खरे आहे.
(२) राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या अंमलबजावणीवर आधारित उच्च शिक्षण संस्थांचे (HEI) चे मूल्यमापन करण्यासाठी प्रणाली (SYSTEM) विकसित करण्याचा निर्णय विद्यापीठ अनुदान आयोगाकडून घेण्यात आला आहे. शैक्षणिक संस्थेने किमान ७५ टक्के अध्यापकांची नियमित / कायमस्वरूपी नियुक्ती करणे हा त्यापैकी एक मापदंड आहे. त्यासंदर्भातील सूचना विद्यापीठ अनुदान आयोगाने प्रसिद्ध केली असून संबंधितांकडून सूचना/प्रतिक्रिया मागविल्या आहेत.
(३) राज्यातील अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील अध्यापकांची ४४३५ पदे भरण्यास मान्यता देण्याचा प्रस्ताव वित्त विभागास सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावावर वित्त विभागाने उपस्थित केलेल्या मुद्यांची माहिती नमूद करुन प्रस्ताव वित्त विभागास फेरसादर करण्यात येत आहे.
(४) हे खरे आहे.
(५) हे खरे नाही.
(६) व (७) राज्यातील अकृषि विद्यापीठांमधील शिक्षकीय पदांच्या ८० टक्के पदे भरण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार अध्यापकीय पदांच्या भरतीबाबत मा. राज्यपाल महोदयांची मान्यता घेऊन दि.२८.०२.२०२५ रोजी आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. तसेच, राज्यातील अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील अध्यापकांची ४४३५ पदे भरण्यास मान्यता देण्याचा प्रस्ताव वित्त विभागास फेरसादर करण्यात येत आहे.

-----------------

## प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेंतर्गत कार्यरत स्वयंपाकी तथा मदतनीस यांचे थकित मानधन व इतर मागण्यांबाबत

**(२५) * ११३३ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.बाबासाहेब देशमुख (सांगोले), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), डॉ.संजय कुटे (जळगाव जामोद), श्री.देवराव भोंगळे (राजूरा), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.काशिनाथ महादु दाते सर (पारनेर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत देण्यात येणाऱ्या शालेय पोषण योजनेत राज्यभरात जवळजवळ २ लाख कर्मचारी मदतनीस व स्वयंपाकी म्हणून काम करीत असून त्यांना प्रतिदिन देण्यात येणारे मानधन हे अत्यल्प आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कर्मचाऱ्यांना दरमहा १ हजार रुपये मानधनात वाढ देण्याचा निर्णय दिनांक २८ जुलै, २०२४ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजूर करण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात अनेक ठिकाणी या कर्मचाऱ्यांना देण्यात येणारे मानधन व इंधनभत्ता गत ६ महिन्यांपासून थकित असल्यामुळे हे कर्मचारी आर्थिक अडचणीत सापडले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या योजनेंतर्गत मदतनीस व स्वयंपाकी म्हणून मोठया प्रमाणात महिला काम करीत असून मानधन वाढ, दिवाळी बोनस, शाळेत सहीचे रजिस्टर ठेवणे व गणवेश म्हणून दरवर्षी २ साडया इ. अनेक मागण्या या महिलांनी शासनाकडे केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या कर्मचाऱ्यांच्या मागण्यांसंदर्भात वेळोवेळी लोकप्रतिनिधींनी शासनाकडे निवेदनाद्वारे मागणी केली असून महिला कर्मचाऱ्यांनी आंदोलनाचा इशारादेखील दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन स्वयंपाकी तथा मदतनीस यांचे थकित मानधन, मानधनात वाढ व इतर मागण्या तात्काळ मंजूर करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) हे खरे नाही.

(२) अंशत: खरे आहे.

योजनेंतर्गत कार्यरत असणाऱ्या स्वयंपाकी तथा मदतनीस यांच्या रु.२५००/- इतक्या मानधनामध्ये रु.१०००/- वाढ करण्याचा निर्णय दि.०५ जुलै, २०२४ रोजीच्या मंत्रीमंडळ बैठकीत घेण्यात आला आहे.

(३) हे खरे नाही.

योजनेंतर्गत कार्यरत असणाऱ्या स्वयंपाकी तथा मदतनीस यांचे माहे जानेवारी, २०२५ पर्यंतचे मानधन अदा करण्यात आले आहे.

(४) व (५) होय, हे खरे आहे.

(६) प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेची अंमलबजावणी केंद्र शासनाच्या निर्देशाप्रमाणे करण्यात येते. सदर योजनेच्या निधी खर्चाचे प्रमाण केंद्र व राज्य ६०:४० असे आहे. सद्य:स्थितीत स्वयंपाकी तथा मदतनीस यांना रु.२५००/- प्रति महा असे मानधन वर्षातील १० महिन्यांसाठी देण्यात येते. सदर मानधनामध्ये केंद्र हिस्सा रु.६००/- व समप्रमाण राज्य हिस्सा रु.४००/- आहे. तथापि, राज्य हिश्श्यातून अतिरिक्त रु.१५००/- मानधन देण्यात येत आहे. तसेच, स्वयंपाकी तथा मदतनीस यांच्या मानधनामध्ये वाढ करण्याची विनंती केंद्र शासनास करण्यात आली आहे.

-----------------

## अभियांत्रिकी परिक्षेच्या पूर्वतयारीची शिकवणी घेणाऱ्या शैक्षणिक संस्थांवर कारवाई करण्याबाबत

**(२६) * ३८४१ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुभाष रोड, जांभळीनाका, ठाणे बाजारपेठेतील इयत्ता ११ वी आणि १२ वी तसेच अभियांत्रिकी परिक्षेच्या पूर्वतयारीची शिकवणी घेणाऱ्या शैक्षणिक संस्थेने अचानक शिकवणी बंद करुन प्रती विद्यार्थी रुपये ६ लाख प्रमाणे बेकायदा शुल्क आकारून एकूण रुपये ३ कोटी इतक्या रकमेचा गैरव्यवहार केला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यात जवळवळ २०० विद्यार्थी व पालकांची आर्थिक फसवणूक झाल्याची तक्रार ठाणे पोलिसात दिनांक ७ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास दाखल केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी करुन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक व आर्थिक नुकसान टाळणेसह संबंधित संस्थेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी अशा खाजगी शिकवणी संस्थांना शासनाच्या अधिपत्याखाली आणून त्यांचेवर नियंत्रण ठेवणेसाठी मार्गदर्शक तत्वे विहित करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी ठाणेनगर पोलीस ठाणे, ठाणे शहर येथे दि. ०६/०१/२०२५ रोजी गु.र.क्र. ११/२५ भारतीय न्यायसंहिता, २०२३ मधील कलम ३१८(४), ३१६(२), ३५१ (२), ३ (५) अन्वये ०८ आरोपींविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी फी आकारणीकरीता वापरत असलेल्या ॲक्सिस बँकेच्या विविध बँक खात्याची माहिती मिळण्यासाठी व गोठविण्यासाठी संबंधित बँकांशी पोलीसयंत्रणेव्दारे पत्रव्यवहार करण्यात आला आहे. सदर प्रकरणी अधिक तपास पोलीस यंत्रणेमार्फत करण्यात येत आहे.

(४) खाजगी शिकवणी वर्गासंदर्भात केंद्र शासनाने माहे जानेवारी, २०२४ मध्ये निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्वांच्या धर्तीवर राज्यातील खाजगी शिकवणी वर्गाकरीता नियमावली तयार करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नारपोली (ता. भिवंडी, जि. ठाणे) येथील मे.ऍक्टिव्हेंटिस बायोटेक प्रा.लि. कंपनीच्या गोदामामध्ये बनावट औषध साठा जप्त केल्याबाबत

**(२७) * ३१३७ श्री.सुरेश धस (आष्टी), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम):** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मु.पो. नारपोली (ता. भिवंडी, जि. ठाणे) येथील मे.ऍक्टिव्हेंटिस बायोटेक प्रा.लि. कंपनीच्या गोदामावर अन्न व औषध प्रशासन विभागाने छापा टाकून रुपये १ कोटी ८५ लाख इतक्या किंमतीचा बनावट औषधसाठा दिनांक १४ डिसेंबर, २०२४ रोजी जप्त केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बनावट औषधांचा पुरवठा या कंपनीमार्फत बीड जिल्हयातील शासकीय रुग्णालय तसेच अन्य ११ जिल्हयातील शासकीय रुग्णालयात करण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी अन्न व औषध प्रशासनाच्या ठाणे कार्यालयाने औषध निरीक्षक यांच्या तक्रारीनुसार मे.ॲक्वेटीस बायोटेक प्रा.लि.कंपनी व मे.काबीज जनरीक हाऊस, मीरा रोड यांचे मालक श्री. मिहीर त्रिवेदी व श्री.विजय चौधरी यांचे विरोधात दिनांक १४ डिसेंबर,२०२४ रोजी वा त्या सुमारास गुन्हा नोंदविला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बनावट औषधे पुरवठा करणाऱ्या कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नरहरी झिरवाळ :**

(१) हे अंशत: खरे आहे.

मे. ऍक्टिव्हेंटिस बायोटेक प्रा. लि., नारपोली, भिवंडी येथून दि.०७.०८.२०२४ रोजी ५२.५९ लाख एवढया किंमतीचा औषधसाठा जप्त करण्यात आला आहे. तसेच, दि.१२.१२.२०२४ रोजी रूपये एक कोटी एक लाख शहात्तर हजार एकशे सव्वीस एवढया किंमतीचा औषध साठा जप्त करण्यात आला आहे.

(२) बीड जिल्हयातील शासकीय रूग्णालय तसेच अन्य जिल्ह्यातील शासकीय रुग्णालयांना या कंपनीने सदर बनावट औषधांचा थेट पुरवठा केलेला नाही. परंतु, ही कंपनी पुरवठा साखळीचा भाग आहे.

(३) व (४) हे खरे आहे.

संचालक, मे. ऍक्टिव्हेंटिस बायोटेक प्रा. लि. भिंवडी तसेच, मालक, मे. काबीज जेनेरीक हाउस, मीरा रोड, ठाणे व इतर सर्व संबंधितांविरूद्ध नारपोली पोलिस स्टेशन, भिंवडी येथे प्रथम खबर अहवाल (FIR) क्र.१९२५/२०२५ दि.१४.१२.२०२४ नोंदविण्यात आला आहे. संबंधित दोन्ही आरोपींना पोलीसांनी अटक केली असून पुढील तपास पोलिसांमार्फत सुरू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अमरावती जिल्ह्यातील कोरोनासंसर्गामुळे मृत पावलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना कर्जमाफी देण्याबाबत

**(२८) *३२० श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोना काळात मृत पावलेल्या शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमरावती जिल्ह्यात कोरोना काळात मृत पावलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना अद्यापही कर्जमाफी देण्यात आली नसल्याने त्यांना आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोरोना संसर्गामुळे मृत पावलेल्या शेतकऱ्यांच्या कर्जमाफीबाबत प्रत्येक जिल्ह्याचा अहवाल सहकार आयुक्तांमार्फत माहे डिसेंबर, २०२२ मध्ये शासनाकडे प्राप्त असूनही अद्याप त्यावर कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन मृत शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना कर्जमाफी देण्याबाबत तसेच यास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील :** (१) हे खरे नाही

(२), (३) व (४)

राज्यातील नागरी सहकारी बँकांना एकरकमी कर्ज परतफेड योजना लागू करण्यात आली असून त्यासंदर्भात आवश्यक कार्यवाही करण्याबाबत सहकार आयुक्त व निबंधक, पुणे यांना दिनांक १९.०३.२०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. तसेच शेतकऱ्यांनी घेतलेल्या कर्जाबाबत काही जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या स्तरावर देखील एकरकमी कर्ज परतफेड योजना राबविण्यात येते. राज्यातील सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये कोविड-१९ मुळे मयत झालेले एकूण कर्जदारांची संख्या ७८९२ इतकी असून त्यांना मंजूर करण्यात आलेल्या कर्जाची रक्कम रु. १३८.३७ कोटी इतकी आहे. तर थकीत कर्जाची रक्कम रु. ११२.१३ कोटी इतकी आहे. अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये कोविड-१९ मुळे मयत झालेले एकूण कर्जदारांची संख्या १२४ इतकी असून त्यांना मंजूर करण्यात आलेल्या कर्जाची रक्कम रु. १.३६ कोटी इतकी आहे. तर थकीत कर्जाची रक्कम रु. १.४० कोटी इतकी आहे. शासनाने शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना, २०१७, महात्मा जोतीराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०१९ या दोन योजना राबविण्यात आल्या आहेत. सदर योजने अंतर्गत पात्र असलेल्या शेतकऱ्यांना त्यांनी घेतलेल्या कर्जापोटी अनुक्रमे रु. १.५ लाख व रु. २.०० लाख पर्यंतच्या थकीत रकमेचा लाभ देण्यात आला आहे. तथापि शेतकऱ्यांनी घेतलेल्या संपूर्ण कर्जाची रक्कम माफ करण्यात येत नाही वा अशा प्रकारचे शासनाचे सद्य:स्थितीत कोणतेही धोरण नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

## राज्यातील अनधिकृत शाळांना रोखण्यासाठी उपाययोजना करणेबाबत

**(२९) * २११ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती सरोज अहिरे (देवळाली), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.महेश सावंत (माहिम), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.सुरेश (राजूमामा)**

**भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील २३२ शाळा मान्यतेविना असून त्यांना यु-डाइस कोडही मिळाला नाही यामुळे ३९,८१९ विद्यार्थ्यांचे भवितव्य अंधारात असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे महानगरपालिका क्षेत्रात ठाणे महानगरपालिका आणि जिल्हा परिषदेच्या शाळा सुरू असतानाही अनधिकृत शाळांची संख्या वाढत असून लातूर महानगरपालिका क्षेत्रात २० विना अनुदानित तर शहरात ३० अनधिकृत शाळा तसेच पिंपरी चिंचवड ग्रामीण भागातही ४९ अनधिकृत शाळा असल्याचे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये निदर्शनास आले हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात अनधिकृत शाळांना रोखण्यासाठी शिक्षण विभागाकडून केलेल्या तपासणीमध्ये ६६१ शाळा अनधिकृतरित्या सुरू असल्याचे निदर्शनास आले त्यातील केवळ ७८ शाळाच बंद करण्यात शासनाला यश आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, लातूर जिल्ह्यातील अशा शाळांची तपासणी करुन शाळांची मान्यता रद्द करण्याचा प्रस्ताव तात्काळ पाठविण्याचे आदेश शिक्षण मंडळाचे संचालक यांनी उपसंचालक, शिक्षक, लातूर यांना माहे सप्टेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान देण्यात आल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, अनधिकृत शाळांबाबत विभागीय शिक्षण उपसंचालकांना कारणे दाखवा नोटिस, तर शिक्षणाधिकाऱ्यांना नोटिस बाजाविण्यात आली असून अनधिकृत शाळा बंद करून फौजदारी कारवाई, गुन्हे दाखल करणे, दंड आकारण्याचे निर्देश क्षेत्रीय कार्यालयांना देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी करुन अनधिकृत शाळांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्याबाबत शासनामार्फत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) अंशतः खरे आहे.

राज्यामध्ये खाजगी व्यवस्थापनाद्वारे संचालित करण्यात येणाऱ्या शाळांपैकी आज रोजी ३८८ शाळा अनधिकृतपणे चालविल्या जात असल्याचे आढळून आले आहे.

(२) अंशतः खरे आहे.

ठाणे जिल्ह्यामध्ये सद्य:स्थितीत ८८ अनधिकृत शाळा (२४ माध्यमिक व ६४ प्राथमिक) सुरू आहेत. त्यापैकी ४१ शाळांवर एफआयआर दाखल करण्यात आला असून अनधिकृत शाळा बंद करण्याबाबत शिक्षणाधिकारी कार्यालयाकडून कारवाई सुरू आहे.

लातूर जिल्ह्यात एक अनधिकृत शाळा सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर शाळेवर नियमानुसार दंड आकारण्यात आलेला आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात २२ अनधिकृत शाळा सुरु असल्याचे निदर्शनास आले असून त्यापैकी ११ शाळा बंद करण्यात आलेल्या आहेत. उर्वरित ११ शाळांपैकी ६ शाळांना मान्यता मिळाली असून ५ शाळांना इरादापत्र प्राप्त झालेले आहे.

(३) अंशतः खरे आहे.

शासन स्तरावर वेळोवेळी झालेल्या बैठकांमधील निर्देशांनुसार आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या दिनांक १८.०७.२०२३ च्या पत्रानुसार राज्यात ६६१ शाळा अनधिकृत सुरु असल्याचे निदर्शनास आले होते. राज्य शासनाद्वारे मागील दोन वर्षांमध्ये घेतलेल्या विशेष मोहिमेद्वारे ११७ शाळा कायमस्वरुपी बंद करण्यात आल्या आहेत.

(४) हे खरे आहे.

(५) हे खरे आहे.

(६) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ च्या कलम १८(५) मधील तरतुदीनुसार शासन मान्यतेशिवाय अनधिकृतरित्या सुरू असणाऱ्या शाळांविरूध्द कारवाई करण्याचे निर्देश शासन निर्णय, दि.१९.०६.२०१०, दि.१०.११.२०२० व दि.१८.१२.२०२३ द्वारे देण्यात आले आहेत. तसेच, आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या

दि.१८.०७.२०२३ रोजीच्या पत्राद्वारे याबाबत विशेष मोहिम राबविण्यात येत आहे.

शासनस्तरावर अनधिकृत शाळांवर कार्यवाही करण्याबाबत वेळोवेळी निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार, शासन निर्णय, दि.१०.०३.२०१० मधील तरतुदींचे पालन करीत असलेल्या सन २०१३ पूर्वीच्या अनधिकृत शाळा व महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ मधील तरतुदींची पूर्तता करीत असलेल्या शाळांबाबत तपासणी करून प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच सन २०१३ नंतरच्या अनधिकृतपणे सुरू असलेल्या शाळा जर उक्त नमूद अधिनियमातील तरतुदींचे पालन करीत असतील तर अशा शाळांच्या प्रस्तावावर अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच, सदर निकषांची पूर्तता करीत नसलेल्या अनधिकृत शाळा बंद करणेबाबत व त्यातील विद्यार्थ्यांचे लगतच्या शाळेत समायोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्य महामार्ग परिवहन महामंडळ को-ऑपरेटिव्ह बँकेत झालेला गैरव्यवहार**

**(३०) * ३७२ श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य महामार्ग परिवहन महामंडळ को-ऑपरेटिव्ह बँकेत मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गैरव्यवहाराची सखोल चौकशी करुन कारवाई करण्यासंदर्भात एसटी कर्मचा-यांनी दिनांक २७ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास पुणे स्टेशन ते सहकार आयुक्त कार्यालयापर्यंत मोर्चा काढून सहकार आयुक्तांना निवेदन दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ठेवीदाराचा निधी सुरक्षित ठेवणेसह दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील :**

(१) अंशत: खरे आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम ८९ अ अन्वये केलेल्या तपासणीमध्ये सदर बँकेत नोकरभरती व्यतिरिक्त इतर कोणताही गैरव्यवहार वा अनियमिततेबाबतचे मुद्दे निदर्शनास आलेले नाहीत.

(२) होय. अध्यक्ष, महाराष्ट्र स्टेट ट्रान्सपोर्ट कामगार संघटना यांनी दि. २९.११.२०२४ व दि. ०३.१२.२०२४ रोजी निवेदन दिले आहे. दि. २९.११.२०२४ च्या निवेदनामध्ये नमूद केल्यानुसार दि. २७.१२.२०२४ रोजी काही कर्मचारी हे मोर्चा काढून सहकार आयुक्त कार्यालयात चर्चा करण्यासाठी आले होते.

(३) सदर बँकेने अधिकारी/कर्मचारी यांची ॲडहॉक व तात्पुरत्या पद्धतीने केलेली नोकरभरती रद्द करणेबाबत सहकार आयुक्त कार्यालयाकडून दिनांक १३.०८.२०२४ रोजी बँकेस सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच बँकेच्या संचालक मंडळाने व्यवस्थापकीय संचालक या रिक्त पदावर नियुती केलेले श्री.सौरभ पाटील यांची नियुक्ती रद्द करण्याबाबत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम ७९ अन्वये सहकार आयुक्त कार्यालयाकडून दिनांक २६.०९.२०२४ रोजी बँकेस निर्देश देण्यात आले आहेत.

एसटी कर्मचा-यांच्या निवेदनातील नमूद मुद्दयांबाबत बँकेचा खुलासा मागविण्यात आला असून त्यानुसार पुढील कार्यवाही सुरु आहे.

तत्पूर्वी बँकेच्या एकंदरीत कामकाजासंदर्भात बँकींग रेग्युलेशन ॲक्ट, १९४९ मधील तरतूदीनुसार रिझर्व्ह बँकेस

कारवाईचे अधिकार असल्याने त्याबाबत सहकार आयुक्त कार्यालयाने दिनांक २६.०६.२०२४ रोजीच्या पत्रान्वये रिझर्व्ह बँकेस विनंती केली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**चंद्रपूर जिल्हयातील पारडी जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना विषबाधा झाल्याबाबत**

**(३१) * १२२१ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्हयातील सावली पंचायत समिती अंतर्गत येत असलेल्या पारडी जिल्हा परिषद शाळेतील १२६ विद्यार्थ्यांना विषबाधा झाल्याचे दिनांक ७ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे काय,
(२) असल्यास, सदरहू विषबाधा प्रकरणाची सखोल चौकशी करुन यातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री. दादाजी भुसे :** (१) अंशत: खरे आहे.
प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत सदरप्रमाणे विषबाधेची घटना दि.०५ डिसेंबर, २०२४ रोजी घडली होती.
(२) संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांविरुध्द निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.
(३) शिक्षणाधिकारी (प्राथ.), जिल्हा परिषद, चंद्रपूर यांनी संबंधित सर्व गटशिक्षणाधिकारी यांना दि.१० डिसेंबर, २०२४ रोजीच्या पत्रान्वये आवश्यक त्या उपाययोजना करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१) (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.